महाराष्ट्र विधानसभा

तिसरे अधिवेशन, २०२२

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

भिवंडी (जि.ठाणे) येथे मौजे कामतघर व टेमघर येथील फेरफार तक्रारींचे प्रकरण प्रलंबित असल्याबाबत

(१) ३५८१६ (०७-०१-२०२२). श्री.संजय केळकर (ठाणे) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) तहसिलदार कार्यालयातील मौजे कामतघर व टेमघर येथील महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम १५५ खालील व सर्व्हे क्र. १३५६ मध्ये एकाच दिवशी दोन फेरफार होऊन मंजुरही झाल्याने तक्रारींच्या अनेक फेरफार प्रकरणे प्रलंबित असल्याचे दिनांक १७ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, ठाणे यांना रोहिदास तरे यांनी तक्रार दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जिल्हाधिकारी यांनी तात्काळ कारवाई करण्याबाबत तहसिलदार, भिवंडी यांना सदर प्रकरणांचे पुनर्विलोकन करण्याकरीता कारवाई करण्याचे आदेश दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू महसूल अधिनियम कलम, १५५ खालील तक्रारी तसेच एकाच दिवशी दोन फेरफार होऊन त्याच दिवशी मंजुरही झालेले असताना उक्त प्रकरणामध्ये अशी अनियमित व अगुणवत्तेच्या आधारावर झालेले चुक दुरुस्ती व चुकीचे फेरफार झाल्याने तहसिलदारांकडून अहवाल मागवून शासन स्तरावर कोणता निर्णय घेण्यात आला आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०४-१०-२०२२) : (१), (२), (३) व (४) तहसिलदार कार्यालय, भिवंडी, जि.ठाणे येथील कार्यालयात महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम १५५ व पुनर्विलोकनाच्या प्रकरणाबद्दल कुठलीही कारवाई होत नसल्याबाबतची तक्रार श्री.रोहिदास हरिश्चंद्र तरे यांनी जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे दिनांक १७.०८.२०२१ रोजी केली आहे.

मौजे कामतघर, ता.भिवंडी, जि.ठाणे येथील सर्व्हे नंबर १३५/२ या मिळकतीचे फेरफार क्र.१७०२ व १७०३ तसेच मौजे कामतघर येथील सर्व्हे नंबर ४९/४२ व मौजे टेमघर, ता. भिवंडी, जि. ठाणे येथील सर्व्हे नंबर १२५ व इतर या जमिनीचे फेरफार महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम १४९ व १५० चे तरतुदीनुसार प्रमाणित केले असून प्रस्तुत प्रकरणी हस्तदोषाची चूक झाल्याचे दिसून येत नाही. तसेच सदरहू फेरफारास याच वर्षाचा कालावधी लोटला असून खरेदीने, वारसाने अनेक त्र्ययस्थ हितसंबंध निर्माण झाले असल्यामुळे फेरफाराबाबत संबंधितांनी सक्षम न्यायालयात दाद मागणे आवश्यक आहे.

सोलापूर शहरातील विको प्रोसेसच्या संचालकांच्या जागेबाबत

(२) ३६०५९ (१२-०१-२०२२). श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर) : सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरातील विणकर सहकारी टेंडर फेडरेशन व्हीको प्रोसेसच्या संचालकांना १८ हजार चौरस फूट जागा विकण्याची परवानगी देण्यात आली व प्रत्यक्षात ८७ हजार १५६ चौरस फूट जागेची विक्री करण्यात आल्याचे दिनांक २८ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास प्रसिद्ध झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत नियंत्रण समितीने किती क्षेत्राची विक्री करण्यास परवानगी दिली आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (२४-०८-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर यांनी त्यांचे दिनांक २३.०२.२०१० च्या पत्रान्वये प्रादेशिक उपआयुक्त, वस्त्रोद्योग, सोलापूर यांच्या अध्यक्षतेखाली सनियंत्रण समिती नियुक्त करुन संस्थेच्या मालकीची एकुण स्थावर मालमत्ता ८७१२० चौ. फुट जागेपैकी १८००० चौ. फुट जागा शिल्लक ठेवून उर्वरित ६९१२० स्के. फुट जागा इमारत शेडसह विक्रीस परवानगी दिली आहे. तसेच सदर संस्थेचे निबंधक म्हणजेच प्रादेशिक उपआयुक्त वस्त्रोद्योग, सोलापूर यांनी उर्वरित १८००० चौ. फुट जागा विक्रीस दिनांक २६.०९.२०२१ रोजी नियमानुसार परवानगी दिली आहे.
(३) होय. सदर सहकारी संस्थेविरुध्द प्राप्त झालेल्या तक्रारीबाबत प्रादेशिक उपआयुक्त तथा निबंधक, रजिस्टर ऑफ सहकारी संस्था, सोलापूर यांनी रितसर चौकशी केली आहे. चौकशी अहवालात सदर संस्थेने रितसर परवानगी घेऊन मालमत्तेची विक्री करुन प्राप्त झालेल्या रक्कमेतून शासकीय भागभांडवल रु.२४.००/- लाख संपूर्ण परतफेड केलेली आहे. तसेच सोलापूर जिल्हा औद्योगिक सहकारी बँकेचे देणे व इतर व्यापारी, सोसायटी, ग्राहक देणीही परतफेड केली असून त्याबाबतचा दाखला सदर संस्थेने प्राप्त केला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्य शासनाचा १०० कोटीहून अधिक महसूल बुडवल्याबाबत

(३) ३८९४७ (०७-०४-२०२२). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाचा १०० कोटीहून अधिक महसूल बुडवल्याच्या प्रकरणाचा सर्व्हे महसूल खात्याकडून सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रेडी रेकनरनुसार ज्या इनाम जमिनीची किंमत होईल त्यातील १५ टक्के रक्कम बांधकाम मंजूरीसाठी आणि शर्ती काढून टाकण्यासाठी ६२ टक्के रक्कम महसूलापोटी शासनाकडे जमा करणे बंधनकारक असून यातून पळवाट काढण्यासाठी जमिनीचा फेरफार बदलणारे रॅकेट कार्यरत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त इनाम जमिनीचा बुडवलेला महसूल जमा न केल्यास ते भूखंड शासन ताब्यात घेणार आहे काय वा त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०४-१०-२०२२) : (१), (२) व (३) हे खरे नाही.
नवीन अविभाज्य दिलेल्या इनाम/वतन (महार वतन व देवस्थान जमीन वगळून) जमिनी ज्या भोगवटदार वर्ग-२ च्या आहेत अशा जमिनीचे अकृषिक कारणास्तव झालेली बांधकामे गुंठेवारी कायद्यांतर्गत नियमित करण्याच्या अनुषंगाने, मुंबई परगणा व कुलकर्णी वतने नाहीशी करण्याबाबतचा अधिनियम, १९५०, मुंबई (समाजास उपयुक्त) सेवा इनामे रद्द करण्याबाबत अधिनियम, १९५३, मुंबई विलीन प्रदेश किरकोळ दुमाला वहिवाटी नाहीशा करण्याबाबत अधिनियम, १९५५ मुंबई गावची कनिष्ठ वतने नाहिशी करण्याबाबत अधिनियम, १९५८ आणि महाराष्ट्र मुलकी पाटील (पद रद्द करणे) अधिनियम १९६२ यांमध्ये सुधारणा करण्यात आलेली असून, याकरिता शासन अधिनियम क्र.१०, दिनांक १६ जुलै, २०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

त्यानुसार, सक्षम प्राधिकाऱ्याच्या पूर्वमान्यतेने शिवाय ज्या इनाम/वतन जमिनी कृषीतर वापराच्या प्रयोजनासाठी अगोदरच हस्तांतरीत झालेल्या आहेत. तसेच, या जमिनीवरील बांधकामे गुंठेवारी अधिनियमान्वये नियामनुकूल केलेली आहेत, अशा बांधकामाखालील इनाम/ वतन जमिनीच्या बाबतीतील सक्षम प्राधिकाऱ्याच्या पूर्वमान्यतेशिवाय झालेले हस्तांतरण संबंधित जमिनीच्या प्रचलित बाजारमूल्याच्या २५% रक्कम प्रदान केल्यावर नियमाधीन करता येईल आणि अशी रक्कम प्रदान केल्यावर, संबंधित जमीनधारक अशी जमीन भोगवटदार वर्ग-१ म्हणून धारण करील अशा आशयाची तरतूद करण्यात आली आहे.

यास्तव , इनाम जमिनीची किंमत होईल त्यातील १५ % रक्कम बांधकाम मंजूरीसाठी आणि शर्ती काढून टाकण्यासाठी ६२% रक्कम महसूलपोटी शासनाकडे जमा करणे बंधनकारक असले तरी त्यातून पळवाट काढण्यासाठी जमिनीचा फेरफार बदलणारे रॅकेट कार्यरत असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोकणातील काजू बागायतदारांना हमीभाव देण्याबाबत व वाईन उत्पादनाबाबत निकष बदलण्यासाठी सकारात्मक निर्णय घेण्याबाबत

(४) ३९३८३ (०१-०४-२०२२). श्री.राजन साळवी (राजापूर) : सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील काजू बागायतदारांना हमीभाव देण्याबाबत व वाईन उत्पादनाबाबत निकष बदलण्यासाठी सकारात्मक निर्णय घेण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सकारात्मक निर्णयावर अंमलबजावणी होणे अपेक्षित आहे, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संदीपानराव भुमरे (१८-०८-२०२२) : (१) (२) व (३) किमान आधारभूत किंमती जाहीर करणे ही बाब केंद्र शासनाच्या अखत्यारितील आहे. केंद्र शासनाने जाहीर केलेल्या शेतमालाच्या किमान आधारभूत किमती सर्व राज्यांना लागू होतात. भाजीपाला व फळपिके या पिकांना केंद्र शासन हमीभाव जाहीर करत नाही.

काजूबोंडे, मोहाफुले पासून उत्पादित केलेल्या पद्यास "देशी मद्य" ऐवजी "विदेशी मद्य" असा दर्जा देणे व या पदार्थासह फळे, फुले यांपासून मद्यार्क उत्पादन व त्यातून विदेशी मद्यनिर्मिती करण्यासाठीचे धोरण गृह विभागाने शासन निर्णय क्रमांक: एमआयएस-०९२०/प्र.क्र.१५४/राउशु-२, दिनांक २३.०६.२०२२ अन्वये जाहीर केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

आरमोरी-कुरखेडा (जि.गडचिरोली) येथे महात्मा गांधी रोजगार हमी योजनेंतर्गत पाणंद रस्ते बांधकामाचा निधी मिळण्याबाबत

(५) ४००८४ (०७-०४-२०२२). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) : सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आरमोरी-कुरखेडा (जि.गडचिरोली) येथे महात्मा गांधी रोजगार हमी योजनेंतर्गत तीन वर्षांपूर्वी पूर्ण करण्यात आलेल्या पाणंद रस्ते बांधकामावरील कुशल कामाचा निधी अप्राप्त असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कामाचा अप्राप्त निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संदीपानराव भुमरे (०२-०९-२०२२) : (१) हे खरे नाही.

आर्थिक वर्ष २०२१-२२ करीता आरमोरी व कुरखेडा तालुक्यांचा कुशल निधीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता. सर्व प्रस्तांवाना शासनाकडुन मंजुरी देण्यात आली असुन निधी वाटप करण्यात आलेला आहे.

(२) निधी वाटप करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्धवत नाही.

उल्हासनगर मतदार संघातील शहाड येथील अमर डे कंपनीने शासनाचे महसूल बुडवले असल्याबाबत

(६) ४०४९७ (११-०४-२०२२). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हानसनगर मतदार संघातील शहाड येथील अमर डाय कंपनीला राज्य सरकारने सन १९६१ मध्ये फॅक्टरीच्या कामासाठी अटी व शर्तीवर जागा देऊन सदर कंपनी १९९६ ला बंद झाली असून शासनाच्या मिळकतीबाबत कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्याकडून पूर्वपरवानगी न घेता दस्त नोंदणी करण्यात येत असून सरकारच्या नियमाचा भंग करून कोट्यवधी रुपयाचा महसूल बुडवीत असून या कंपनीवर कारवाई करावी अशी मागणी लोकप्रतिनिधी यांनी तत्कालीन मुख्यमंत्री, तत्कालीन महसूल मंत्री, तत्कालीन पर्यावरण मंत्री, ठाणे जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी कल्याण, उल्हासनगर, तहसीलदार कल्याण, उल्हासनगर यांना दिनांक ११ नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीने कामगारांची देणी न दिल्यामुळे मा.उच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मिळकतीवर बँक आणि अमर डाय कंपनीने शासनाची कुठलीही पूर्वपरवानगी न घेता मिळकतीच्या कागदपत्रांची पडताळणी न करता कोट्यवधी रुपयाचा महसूल बुडविला असून सरकारची फसवणूक केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर दस्ताची नोंदणी मा.दुय्यम निबंधक कार्यालय कल्याण यांच्याकडे केली आहे काय तसेच अमर डाय कंपनीने केलेल्या अर्जावर दिनांक २९ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास कुठलीही कार्यवाही करू नये अशी मागणी लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, ठाणे यांना केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत कंपनीने शासकीय देणी दिली नसल्याने तसेच ७/१२ वर कोणताही बोजा न चढविता कुठलीही नोटीस न देता अमर डाय कंपनीला लाभ पोहोचविण्याचे काम होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(६) असलयास, यासंदर्भात कंपनीने सदर जागा श्री.साल्साफुरीक प्रा.फाय या कंपनी ऐवजी सनव्हेन रियल्टी या कंपनीबरोबर करार करून सदर जागा विकण्याचे ठरविले आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, उक्त कंपनीविरुध्द शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय आढळून आले आहे व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-१०-२०२२) : (१), (२), (३), (४), (५), (६), (७) व (८) मे.अमर डाय कंपनी, लि. शहाड, कल्याण या कारखान्यातील जमीन सरकार जमा करणेबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मंत्री (महसूल) यांना दिनांक ०९.१२.२०२१ रोजी दिले आहे. सदर कंपनीच्या विरुध्द मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे कंपनी पिटीशन क्र.८९५/१९९८ दाखल असून मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक ०९.१२.१९९८ रोजीच्या आदेशानुसार सदर कंपनी WINDING UP करून सन १९९८ ते २०१९ या कालावधीत ऑफीशिएल लिक्विडेटरकडे संपुर्ण जबाबदारी दिली होती.

सह दुय्यम निबंधक, कल्याण यांचे कार्यालयात सदर कंपनीच्या नावे कॉम्पोझिशन डीड दस्त क्र.६४१८/२०१३, दिनांक २६.०९.२०१३ रोजी नोंदणीकृत झालेला असून मुद्रांक शुल्काचा भरणा केलेला आहे.

मे.अमर डाय कंपनीने श्री. साल्साफुरीक प्रा.फाय या कंपनी ऐवजी सनव्हेन या कंपनीबरोबर करारनामा केल्याची माहिती जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या कार्यालयकडे उपलब्ध नाही तसेच याबाबत कंपनीने कोणताही अर्ज दाखल केला नाही. सबब, प्रश्न उद्भवत नाही.

मौजे दिवाणमान (ता.वसई, जि.पालघर) येथील सरकारी जागा वसई-विरार शहर महानगरपालिकेस हस्तांतरित करण्याबाबत

(७) ४०६९२ (०७-०४-२०२२). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे दिवाणमान (ता.वसई, जि.पालघर) येथील सर्व्हे नं.१७६ अ येथील सरकारी जागा वसई-विरार शहर महानगरपालिकेला शहर विकास कामांकरीता हस्तांतरित करण्याबाबतचा प्रस्ताव सन २००० या कालावधीपासून शासन स्तरावर प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान हिवाळी अधिवेशनामध्ये तत्कालीन महसूल मंत्री यांनी महसूल विभागाची सदरची जागा वसई-विरार शहर महानगरपालिकेस हस्तांतरित करण्याबाबतची कार्यवाही सुरु असून सदरची जागा महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्यात येईल असे आश्वासित करुन त्यानुसार कार्यवाही होण्याबाबतचे लेखी निवेदन माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान वेळोवेळी स्थानिक लोकप्रतिनिधींनी तत्कालीन मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त दीर्घकाळपासून प्रलंबित असलेल्या प्रकरणावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०२-०९-२०२२) : (१), (२), (३) व (४) मौजे दिवाणमान, ता.वसई, जि.पालघर येथील सर्व्हे नं.१७६ अ मधील सरकारी जागा महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १३.०४.२०१७ रोजी दिनांक १९.०८.२०२१ रोजी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिले आहे.

जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिनांक २०.०८.२०११ च्या आदेशान्वये मौजे दिवाणमान, ता.वसई, जि.पालघर येथील सर्व्हे नं.१७६ व इतर सर्व्हे नंबर मधील आरक्षित असलेल्या जागेचा आगाऊ ताबा “अतिक्रमणापासून संरक्षणासाठी” वसई विरार शहर महानगरपालिकेस दिलेला आहे. तसेच मौजे दिवाणमान, ता.वसई, जि.पालघर येथील सर्व्हे नं.१७६/१ क्षेत्र ४७.५०.० हे. आर क्षेत्रापैकी ५० एकर जमीन पोलीस हेड क्कार्टर्स व परेड ग्राऊंड मिरा भाईंदर-वसई विरार आयुक्तालयास हस्तांतरीत करणेबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई व जिल्हाधिकारी, पालघर यांनी शासनास सादर केला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने गृह विभाग व वित्त विभागाचे अभिप्राय घेण्यात आले असून पर्यावरण विभागाचे अभिप्राय मागविण्यात आले आहेत. पर्यावरण विभागाचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार उचित कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

म्हारळ (ता.कल्याण, जि.ठाणे) ग्रामपंचायतीला सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पासाठी जागा मिळण्याबाबत

(८) ४०७९८ (०१-०४-२०२२). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हारळ (ता.कल्याण, जि.ठाणे) ग्रामपंचायतीला सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पासाठी जागा मिळण्याबाबतची मागणी ग्रामपंचायतीने लोकप्रतिनिधीकडे केली होती त्यांनी सदर मागणीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, ठाणे व शासनाकडे केला

आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठाणे जिल्हाधिकारी यांनी सदर ग्रामपंचायतीला कागदपत्रे पूर्ण करून परत प्रस्ताव पाठविण्याचे निर्देश दिले आहेत तसेच म्हारळ ग्रामपंचायत यांनी सर्व कागदपत्रे पूर्ण करून जिल्हाधिकारी, ठाणे यांना पाठविण्यात आले असून अद्यापही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त मागणीच्या अनुषंगाने म्हारळ ग्रामपंचायतीला सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पासाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-१०-२०२२) : (१), (२) व (३) मौजे म्हारळ हद्दीतील सर्वे नं.५३/५/अ एकूण क्षेत्र ७-८५-० हे. आर पैकी ०-८०-० हे. आर ही जागा सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पासाठी ग्रामपंचायत, म्हारळ यांना मिळणेबाबतची विनंती सरपंच / ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, म्हारळ यांनी दिनांक २१/०८/२०१९ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, ठाणे यांना केलेली आहे.

सदरहू विनंतीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, ठाणे यांनी विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई यांचेमार्फत प्रस्ताव शासनास सादर केलेला आहे. सदरहू प्रस्तावाच्या अनुषंगाने त्रृटीपुर्तता अहवाल जिल्हधिकारी, ठाणे यांनी दिनांक ०८.०७.२०२२ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर केला असून त्यानुसार सदर प्रस्तावावर नियमानुसार उचित कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.
४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे नारपोली (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील लक्ष्मीबाई चंद्रया डुकले यांची जमिन बळकवल्याबाबत

(९) ४०८६२ (०७-०४-२०२२). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे नारपोली (ता.भिवंडी,जि.ठाणे) येथील सव्हे क्र.९४ या जमिन मिळकतीमध्ये आदिवासी खातेदार लक्ष्मीबाई चंद्रया डुकले यांच्या जागेवर असलेले भाडेकरु सुर्यकांत सामाणी व इतर यांनी बनावट बिनशेती परवानगी तसेच बनावट दस्ताच्या आधारे लक्ष्मीबाई डुकले या मयत झाल्यानंतर जमिन बळाकवली असून बनावट दस्त व बनावट बिनशेती परवानगी याबाबत अंगठे तपासणी तज्ञ पुणे यांनी समाणी यांचे दस्तावरील लक्ष्मीबाई डुकले यांचे अंगठे खोटे असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचे दस्त हे सहदुय्यम निबंधक, भिवंडी-१ यांच्याकडे दिनांक ११ नोव्हेंबर, २००३ रोजी वा त्यासुमारास नोंदणी झाली, परंतु लक्ष्मीबाई डुकले या तत्पूर्वीच म्हणजे दिनांक १० आक्टोबर मयत झालेले असून सदर व्यक्तीच्या अंगठ्याचा ठसा सहदुय्यम निंबधक बबड-१ यांच्याकडे उपलब्ध असून अंगठे दिलेल्या दिवशी लक्ष्मीबाई डुकले या एक महिन्यापूर्वीच मयत असल्यामुळे संबधित सामाणी भाडोत्री आरोपी यांनी त्यांच्या जमिन मिळकतीवर कब्जा करुन बनावट दस्त बनविल्याचे आदिवासी खातेदार वारस काळुराम धासी यांनी तक्रार पोलिस उपायुक्त भिवंडी व नारपोली पोलिस स्टेशन यांच्याकडे दिनांक २१ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास भिवंडी महानगरपालिका तसेच जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडेही केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची पोलिस अधिकाऱ्यांनी व इतर विभागांनी आदिवासी कायदा अ‍ॅट्रोसिटी अत्याचार कायद्यानुसार बनावट दस्त बनवून जागेची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात येणार आहे काय तसेच हस्तांक्षर तज्ञांचा अभिप्राय पाहता तक्रार देऊनही संबंधित अधिकाऱ्यांनी अशा गंभीर प्रकरणावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-१०-२०२२) : (१), (२) व (३) मौजे नारपोली, ता.भिवंडी, जि.ठाणे येथील गट क्र.९४/१, क्षेत्र ३५.०० आर चौ. मी. च्या गाव नमुना नंबर ७/१२ उता-यावर भोगवटदाराचे नाव या सदरी सुर्यकांत मंगलदास सामाणी यांच्या नावाची नोंद आहे.

लक्ष्मीबाई डुकले यांच्या जमीन मिळकतीवर कब्जा करून बनावट दस्त बनवून फसवणूक केल्याची तक्रार श्री.काळुराम धापसी (आदिवासी) यांचे कुलमुखत्यारधारक श्री.नागेश किसनराव निमकर यांनी जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे दिनांक २४.०१.२०२२ रोजी दाखल केली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याबाबत तहसिलदार, भिवंडी यांनी वरीष्ठ पोलीस निरीक्षक, नारपोली पोलीस स्टेशन यांना दिनांक ०२.०३.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने वरीष्ठ पोलीस निरीक्षक, नारपोली पोलीस स्टेशन यांनी दिनांक २९.०४.२०२२ रोजी पोलीस ठाणे गुरनं. २२७/२०२२ भा.दं.वि.क. ४२०,४६४,४६५ व ४७१ सह अनुसूचित जाती जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम २०१५ अन्वये गुन्हा दाखल केला असून सदर गुन्ह्याचा तपास सहायक पोलीस आयुक्त, भिवंडी यांचेमार्फत करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे उशिद फळेगांव तसेच कशेळी गाव (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील आकारीपड जमिनीचे अतिक्रमण नियमित करण्याबाबत

(१०) ४०८६३ (१२-०४-२०२२). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे उशिद फळेगांव (ता.कल्याण, जि.ठाणे) तसेच कशेळी गांव (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील आकारीपड जमिनीचे अतिक्रमण नियमित करण्याबाबत तत्कालिन महसूल मंत्री यांनी आदेश दिले होते, तसेच सन १९९९ च्या परिपत्रकाप्रमाणे तत्कालिन प्रधान सचिव यांनी उक्त जागेवरील शेतक-यांचे अतिक्रमण नियमित करण्याबाबत आदेश दिले होते, हे खरे आहे काय,

(२) तसेच मा.उच्च न्यायालय जनहित याचिक २०४/२०१० प्रमाणे आकारीपड जमीनीचे शेतकरी भगवान भोईर व बाळू राघो तरे व इतर यांचे सन १९९० पूर्वी गावानमुना १ मध्ये अतिक्रमित नोंद असलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनी तात्काळ नियमित करण्याचे आदेश मा.उच्च न्यायालय यांनीसुध्दा जनहित याचिकेत केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) त्याचप्रमाणे शासन परिपत्रकानुसार दिनांक ९ मार्च, २००७ व ४ डिसेंबर, २००८ प्रमाणे आकारीपड जमिनी नियमाकुल करण्याबाबत शासनाने यापूर्वीच अध्यादेश काढल्याने व शेतकरी भगवान भोईर यांनी गावनमुना १ मध्ये सन १९७९ पासून अतिक्रमित नोंद असल्यामुळे सदरच्या मागणी केलेल्या जमिनीमध्ये त्यांचे अतिक्रमण नियमाकुल होण्यास शासनाने कित्येक वर्ष विलंब केल्याने शेतकरी भगवान भोईर यांचे आकारीपडवरील जमिनीचे अतिक्रमण तात्काळ नियमाकुल होण्यासाठी तात्कालिन महसूल मंत्री यांनी काढलेल्या आदेशावरुन जिल्हाधिकारी यांनी सर्व कागदपत्राचे अवलोकन करुन तात्काळ कारवाई करण्याची गरज असतांनाही कोणतीच कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सन १९९० पूर्वीच्या ज्या आकारीपड जमिनी अतिक्रमित झाल्या त्या अतिक्रमण नियमित करण्यासाठी मा.उच्च न्यायालयाने आदेश दिलेले असताना संबंधित अधिकारी गैरव्यवहाराची अपेक्षा करुन शेतकऱ्यांच्या अतिक्रमण नियमित करण्याच्या कार्यवाहीसाठी टाळाटाळ करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त आकारीपड जमिनीचे अतिक्रमण नियमित करण्यासाठी शेतकऱ्यांना नाहक त्रास देणे, उच्च न्यायलयाचे आदेश, तत्कालिन महसूल मंत्र्यांचे आदेश व शासनाचे अतिक्रमण नियमित करण्याचे परिपत्रक या सर्वांना संबंधित अधिकारी दुर्लक्ष करुन प्रकरण दडपण्याचा प्रयत्न करत असल्यास त्यांच्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०४-१०-२०२२) : (१), (२), (३), (४), (५) व (६) श्री.भगवान नारायण भोईर तर्फे कुळ मुखत्यार धारक श्री.नागेश निमकर यांनी मौजे उशिद, ता.कल्याण, जि.ठाणे येथील स. क्र.८२/१२/अ, क्षेत्र १.६३ हे. आर व स. क्र.८२/१२/ब, क्षेत्र ०.९१ हे. आर जमिनीच्या अनुषंगाने तत्कालीन मा.मंत्री (महसूल) यांचेकडे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम २५७ अन्वये पुनरिक्षण अर्ज दाखल केला होता. सदर अर्जाच्या अनुषंगाने मा.मंत्री (महसूल) यांनी दिनांक २३.०७.२०१९ रोजी अर्जदार यांचा फेरतपासणी अर्ज अंशत: मान्य केला व अर्जदाराने सादर केलेल्या पुराव्याची तपासणी करून प्रचलित शासन धोरणातील तरतुदीनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांना आदेशित केले आहे. सदर प्रकरणी प्रचलित शासन धोरणातील तरतुदीनुसार संबंधितांची सुनावणी घेवून, प्रकरण निर्णित करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या स्तरावर सुरु आहे.

तसेच मौजे कशेळी, ता.भिवंडी येथील स. नं.१९३ मधील शेतीचे अतिक्रमण नियमानुकूल करणेबाबत श्री शांताराम बाळू तरे यांचे कुळ मुखत्यारधारक श्री. नागेश निमकर यांचे अर्जाच्या अनुषंगाने तहसिलदार, भिवंडी यांनी दिनांक १८.०२.२०२२ रोजी प्रस्ताव जिल्हाधिकरी, ठाणे यांच्या कार्यालयाकडे सादर केला आहे. त्यानुषंगाने नियमानुसार योग्य ती कार्यवाही जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या स्तरावर करण्यात येत आहे.

जनहित याचिका क्र.२०४/२०१० मध्ये मा.उच्च न्यायालयाने पारीत केलेल्या आदेशानुसार तहसिलदार, कल्याण यांनी एकूण ४७ प्रकरणांमध्ये कार्यवाही केली आहे. श्री.भगवान नारायण भोईर यांचे अतिक्रमण दिनांक १६.०८.२०११ रोजीच्या पत्रान्वये अपात्र ठरविण्यात आले आहे. तसेच तहसिलदार, भिवंडी यांनी शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दिनांक १२.०७.२०११ अन्वये सन २०१५ मध्ये एकूण १००५ प्रकरणांमध्ये निर्णय घेण्यात आला आहे.

बुलढाणा विधानसभा मतदार संघातील उपविभागीय अधिकारी, महसूल विभाग यांनी पदाचा गैरवापर केल्याबाबत

(११) ४११६५ (०७-०४-२०२२). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा विधानसभा मतदार संघातील उपविभागीय अधिकारी, महसूल विभाग, बुलढाणा यांनी पदाचा गैरवापर करुन मनमानी कारभार करीत असल्याची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २४ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास तत्कालीन महसूल मंत्री, अप्पर मुख्य सचिव, महसूल विभाग यांच्याकडे दिनांक ६ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०६-१०-२०२२) : (१) व (२) स्थानिक लोकप्रतिनिधी यांचेकडून प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने अपर जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचे स्तरावर चौकशी करण्यात आली असून अहवाल जिल्हाधिकारी, बुलढाणा यांना सादर केला आहे. सदरहू अहवालाची सखोल चौकशी करणेकरिता जिल्हाधिकारी कार्यालय स्तरावर समिती स्थापन करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

अकोट (जि.अकोला) येथील तहसील कार्यालयातील पदे रिक्त असल्याबाबत

(१२) ४१४९० (३१-०३-२०२२). श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोट (जि.अकोला) येथील तहसील कार्यालयातील एकूण १५ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामध्ये नायब तहसीलदार, अव्वल कारकून, लिपिक आणि शिपाई या पदांचा समावेश आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात प्रशासनिक निकड म्हणून सदर सर्व पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०६-०९-२०२२) : (१), (२) व (३) अकोट (जि.अकोला) येथील तहसिल कार्यालयातील नायब तहसिलदार-४, अव्वल कारकून-१, महसूल सहायक-४, शिपाई-३ अशी एकूण १२ पदे रिक्त असून अव्वल कारकून, महसूल सहायक व शिपाई यांची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी यांचे स्तरावरुन करण्यात येणार आहे. तर, नायब तहसिलदार संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबतचा पदोन्नतीचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन आहे. सदर प्रस्ताव मान्यतेनंतर नायब तहसिलदारांची रिक्त पदे भरण्यात येतील.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

शेतकरी व शेतमजूर रोजंदारीने काम करणाऱ्या निराधार महिलांच्या स्वावलंबनासाठी स्वयंरोजगार उपलब्ध करण्याबाबत

(१३) ४१४९६ (०६-०४-२०२२). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन २०२२ हे वर्ष शासन महिला शेतकरी सन्मान वर्ष म्हणून साजरा करणार असल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कृषी योजना, शेतकरी उत्पादक कंपन्या, स्मार्ट योजना यासारख्या योजनांमध्ये महिला शेतकऱ्यांचा सहभाग वाढवण्यासाठी शासन स्तरावर कोणत्या उपाययोजना केल्या आहेत काय,
(३) असल्यास, याबाबत आत्महत्या व कोरोनामुळे पतीचा मृत्यू झाल्याने विधवा झालेल्या शेतकरी/शेतमजूर/रोजंदारीने काम करणाऱ्या निराधार महिलांच्या स्वावलंबनासाठी तसेच स्वयंरोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या व करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अब्दुल सत्तार (२३-०८-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) महाराष्ट्र शासनाने वर्ष २०२२-२३ हे महिला शेतकरी व शेतमजुर सन्मान वर्ष म्हणून साजरे करण्याचे जाहीर केले आहे. शेतकऱ्यांसाठीच्या वैयक्तीक लाभाच्या योजनांमध्ये ५० टक्के आरक्षण महिला शेतकऱ्यांसाठी ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
(३) याकरीता कृषि विभागात स्वतंत्र योजना नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात विदर्भ पटवारी संघटना व नागपूर जिल्ह्यातील राजस्व मंडळ अधिकारी संघटनेचे सदस्य सामुहिक रजा आंदोलन करीत असल्याबाबत

(१४) ४१७४४ (११-०४-२०२२). श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भ पटवारी संघटना व नागपूर जिल्ह्यातील राजस्व मंडळ अधिकारी संघटनेचे सदस्य दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास पासून सामुहिक रजा आंदोलन करीत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच काटोल (जि.नागपूर) येथील शेतकऱ्यांना व सर्वसाधारण नागरिकांना ७/१२ व ८-अ ची आवश्यकता असतांना आंदोलनामुळे ही प्रमाणपत्रे मिळणे बंद झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात पटवारी संघटना व नागपूर जिल्ह्याची राजस्व मंडळ अधिकारी संघटनेच्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०७-१०-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही.
सदर आंदोलनादरम्यान नागपूर जिल्ह्याअंतर्गत काटोल तालुक्यातील सर्व तलाठी व मंडळ अधिकारी सामुहिक रजेवर असले तरी तालुक्यातील शेतकरी व नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणुन ई-सेवा केंद्रावर नमुना ७/१२ व नमुना ८-अ उपलब्ध होईल याची दक्षता घेण्यात आली होती.
(३) व (४) पटवारी संघटना व नागपूर जिल्हा राजस्व मंडळ अधिकारी संघटनेच्या मागणीच्या अनुषंगाने संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेऊन त्यांना रजा आंदोलन मागे घेण्याकरिता त्यांचे समुपदेशन करण्यात आले.
संघटनेने सुरु केलेले रजा आंदोलन मागे घेत असल्याचे निवेदन सादर केलेले असून जिल्ह्यातील सर्व तलाठी व मंडळ अधिकारी दिनांक १०.०१.२०२२ रोजी पासून कामावर रुजू झाले आहेत.

पालघर जिल्ह्यात आदिवासी शेतकऱ्यांच्या ताब्यात असलेल्या जमिनीवर नावे नोंद करण्याबाबत

(१५) ४२५३३ (०७-०४-२०२२). श्री.विनोद निकोले (डहाणू) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात पालघर जिल्ह्यात विविध प्रकल्पांसाठी अधिग्रहण जमिनीपैकी अधिकतर जागेचे मूळ मालक मुंबई, सुरत, अहमदाबाद अशा ठिकाणी राहत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, सदरहू जमिनी मागील ५०-६० वर्षांपासून आदिवासी शेतकऱ्यांच्या ताब्यात असूनही त्याच्या नावांची नोंद ७/१२ मध्ये कुठेही आढळून येत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मागील ५०-६० वर्षांपासून सदर जमिनी आदिवासी शेतकऱ्यांच्या ताब्यात असतानाही त्यांना ७ / १२ नोंदणीपासून वंचित ठेवण्याची सर्वसाधारण कारणे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,क त्यानुसार या आदिवासी शेतकऱ्यांची नोंद ७/१२ मध्ये घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०२-०९-२०२२) : (१), (२), (३), (४) व (५) पालघर जिल्ह्यामध्ये मुंबई-अहमदाबाद अति जलद रेल्वे प्रकल्प, मुंबई-वडोदरा एक्सप्रेस वे समर्पित माल वाहतूक रेल्वे प्रकल्प, विरार-डहाणू रोड चौपदरीकरण रेल्वे मार्ग व इतर प्रकल्पांसाठी जमिनीचे अधिग्रहण करण्यात येत आहे. पालघर जिल्ह्यामधील डहाणू व तलासरी या तालुक्यातील अधिग्रहीत करण्यात येत असलेल्या जमिनीचे अधिकतर मुळ मालक मुंबई, सुरत, अहमदाबाद व इतर

ठिकाणी राहत असून त्या जमिनी अन्य शेतक-यांच्या ताब्यात असल्याचे संयुक्त मोजणीच्या वेळी निदर्शनास आले आहे.

डहाणू तालुक्यातील जमिनीच्या संदर्भात महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम ७० ब व ३२ ग अन्वये दाखल झालेल्या दाव्यांमध्ये निर्णय होऊन आदेश पारीत करण्यात आले आहेत. तसेच उर्वरीत दाव्यांमध्ये सुनावणीची कार्यवाही सुरु आहे.

तलासरी तालुक्यामधील जमिनीच्या पीक पाहणी कामी जमीन कसत असलेल्या शेतक-यांच्या नावाची नोंद घेणेबाबत अर्ज प्राप्त झाल्यानंतर चौकशी करून शासनाच्या प्रचलित नियमातील तरतूदीनुसार कार्यवाही सुरु आहे.

राज्यात केंद्र सरकारच्या आत्मनिर्भर व स्टँड अप इंडिया योजनेतील कर्ज मंजूरी संथगतीने होत असल्याबाबत

(१६) ४३०७४ (१२-०४-२०२२). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोनानंतर केंद्र सरकारच्या आत्मनिर्भर योजनेतून नव्याने अन्न प्रकियेत उद्योग करण्यास तयार असणाऱ्या ६ हजार १९४ जणांनी अर्ज केले असता त्यातील केवळ १०४ अर्ज प्रकरणे मंजूर झाल्याचे दिनांक ४ जानेवारी,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच केंद्र सरकारच्या स्टँड अप इंडिया योजनेची राज्यात अंमलबजावणी हळू प्रमाणात असून या योजनेतून २३ हजार ८३२ जणांना म्हणजे केवळ २३.४८ टक्के जणांना कर्ज मंजूर झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन सदरील योजनांमधून उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी केंद्राने आवश्यक ती कार्यवाही करावी, यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अब्दुल सत्तार (२२-०८-२०२२) : (१) होय.

प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेंतर्गत (PMFME) दिनांक ०४.०१.२०२२ अखेरपर्यंत ६३१४ व्यक्तींनी PMFME MS Portal वर नोंदणी केली असून त्यातील दिनांक ०४.०१.२०२२ अखेरयंत १३३ प्रकल्पांना बँक कर्ज मंजूर झाले आहे. तसेच दिनांक ३१.०३.२०२२ अखेरपर्यंत ९०५४ व्यक्तींनी PMFME MS Portal वर नोंदणी केली असून त्यातील दिनांक ३१.०३.२०२२ अखेरपर्यंत ५७९ प्रकल्पांना बँक कर्ज मंजूर झाले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) अर्जदाराचा आर्थिक अहवाल खराब असणे, अर्जदाराची बँकेकडे थकबाकी असणे, अर्जदारास नियोजित कर्ज-प्रकल्पांची पूर्ण माहिती नसणे इ. कारणांमुळे स्टँड अप इंडिया योजनेंतर्गत कर्जे कमी प्रमाणात वितरित होत आहेत. स्टँड अप इंडिया योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार (अर्हतेनुसार) प्रती शाखा कमीत कमी १ अनुसूचित जाती-अनुसूचित जमाती किंवा १ महिला अर्जदार यानुसार रक्कम रु.१०.०० लाख ते रु. १.०० कोटीचे सर्वात पहिले (Green Field) कर्ज उद्दिष्ट लागू होते. कर्जास लागू असणाऱ्या निकषास अनुसरुन कमी प्रमाणात कर्जदार पात्र ठरतात. तसेच ग्रामीण भागात पुरेशा प्रमाणात कर्ज मागणी होत नाही.

केंद्र शासनाच्या स्टँड अप इंडिया योजनेंतर्गत अनुसूचित जमातीच्या घटकांकरिता मार्जिनमनी उपलब्ध करुन देण्यासाठी आदिवासी विकास विभागाकडून शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. आदिवासी विभागाच्या अधिनस्त येणाऱ्या शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाकडे सदर योजनेंतर्गत अनुदान प्राप्तीसाठी १० प्रस्ताव प्राप्त झाले होते. त्यापैकी ६ प्रस्ताव अनुदानास पात्र असल्याचे शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाने कळवून शासनाच्या मान्यतेसाठी सादर केले आहेत. त्या अनुषंगाने शासन स्तरावर पुढील तपासणी/कार्यवाही आदिवासी विकास विभागामार्फत करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

उपजिल्हाधिकारी (ता.अंबाजोगाई, जि.बीड) येथे जनहिताची कामे होत नसल्याबाबत

(१७) ४३१८२ (२९-०३-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई, (जि. बीड) उपजिल्हाधिकारी कार्यालयात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सातत्याने केज विधानसभा मतदार संघातील विविध विषयाबाबत दूरध्वनीद्वारे वा प्रत्यक्ष भेटीत वारंवार पाठपुरावा केला मात्र उपजिल्हाधिकारी श्री.झाडके यांनी कुठलीही कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अंबाजोगाईचे उपजिल्हाधिकारी, श्री.झाडके हे प्रत्येक विषयावर टोलवाटोलवी करत असून लोकप्रतिनिधींच्या पत्रावर फक्त संबंधित विभागास औपचारिकता म्हणून पत्र पाठवतात त्यामुळे त्यांना लोकप्रतिनिधी यांनी सुचविलेल्या विषयावर कुठलेही गांभीर्य नसल्याचे निदर्शनास येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाच्या नियमाप्रमाणे निर्णय घ्यावेत म्हणून बरीच पत्रेही दिली असून त्यातील काही पत्रांची दिनांक, जावक नंबर व विषय ज्यामध्ये उपजिल्हाधिकारी यांनी कुठलीच कार्यवाही केली नाही, अशी पत्रे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी तत्कालीन महसूल मंत्री यांना दिनांक १४ नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे पाठवले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात प्रत्यक्षात सर्व विषयाबाबत शासन निर्णय व शासन नियमाप्रमाणे निर्णय घेणे अपेक्षित आहे परंतु श्री, झाडके हे जाणीवपूर्वक जनतेच्या हिताची, कामे करीत नसल्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी कार्यवाही करण्याबाबत राज्याचे महसूल मंत्री यांना दिनांक १४ नोव्हबंर,२०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०६-१०-२०२२) : (१), (२), (३), (४) व (५)

स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १४.११.२०२१ रोजी केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालावर कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे-म्हारळ (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील शासकीय जमिनीवर बेकायदेशीर अतिक्रमण केल्याबाबत

(१८) ४३८१३ (१२-०४-२०२२). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे-म्हारळ (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील स.नं.४० ते ५८ मधील एकुण ६२ एकर ०९ गुंठे शासकीय जमिनीची (अंदाजे बाजार भावाप्रमाणे रु.५०० कोटी) शासनाच्या एस-३०/जमिन/२७८९/प्र.क्र.१०४ ज-४, दिनांक २३/०३/१९९६ च्या एका बोगस व बेकायदेशीर आदेशाद्वारे कवडी मोलाच्या भावाने म्हणजेच रु.१,६८,९३,१४०/- ला विक्रीचे गैरव्यवहार प्रकरण तसेच स.नं.५३/५ पै मधील २१ एकर शासकीय जमिनीवरील (१०० कोटी किंमतीच्या) जमिनिवर बेकायदेशीर अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात तत्कालीन मा.राज्यमंत्री (महसुल) यांनी सदरची जमिन संपादन करून मूळ मालकांना मोबदला दिला की नाही हे स्पष्ट होत नाही व सदर जमिनीची फक्त रिक्वीझीशन (मागणी) केली असून संपादनाचे रेकॉर्ड उपलब्ध असतांनाही उपलब्ध नसल्यामुळे मूळ मालकांना मोबदला दिला वा नाही हे स्पष्ट होत नाही, असे आदेशात खोटे नमुद केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत तत्कालीन राज्यमंत्री (महसुल) यांच्या आदेशाप्रमाणे जमिन संपादनच केल्या नव्हत्या व केवळ

रिक्वीझीशन केल्या होत्या हे स्पष्ट होते असे ग्राह्य धरले तर कायद्यातील तरतुदीप्रमाणे जमिनी मूळ मालकांना परत करणे गरजेचे असतानाही तसे न करता म्हारळ सहकारी सामुदायिक शेती संस्था मर्यादित या तिसऱ्या संस्थेला बेकायदेशीररित्या जमिनी दिल्या गेल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तत्कालीन जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिनांक २२ जुलै, २००८ च्या आदेशाने जमिन शेती करण्यासाठीच संस्थेच्या नावे ७/१२ वर वर्ग केली व संस्थेने आठच दिवसात जमिन शेती योग्य नसून जमिन विक्रीस परवानगी मागितल्याने संस्थेच्या खोट्या अर्जातील कारण ग्राह्य मानून जमिन विक्रिस परवानगी दिल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासकीय जमिनीवर खोटी कागदपत्रे तयार करुन बिल्डरच्या नावे करणाऱ्या दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-१०-२०२२) : (१), (२), (३), (४), (५) व (६)

जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिनांक २८/९/१९५४ रोजीच्या आदेशान्वये मौजे म्हारळ, ता.उल्हासनगर, जि.ठाणे येथील स.नं. ४० ते ५८ मधील ८३ एकर ९ गुंठे जमीन म्हारळ सहकारी सामुदायिक शेती संस्था यांना एकसाली भाडेपट्ट्याने लागवडीसाठी दिली होती. तथापि, एकसाली भाडेपट्याची मुदत उक्त संस्थेने वाढवून न घेतल्यामुळे, सदर जागेवर अतिक्रमण आहे असे गृहीत धरुन सहायक जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिनांक १०/४/१९८७ रोजीच्या आदेशान्वये सदर अतिक्रमण दूर करण्याबाबत आदेश दिले होते.

सदर जमिनीच्या अनुषंगाने म्हारळ सामुदायिक शेती सोसायटी लि., म्हारळ यांनी तत्कालीन मा. राज्यमंत्री (महसूल) यांचेकडे पुनर्विलोकन अर्ज दाखल केला होता. सदर पुनर्विलोकन अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन मा. राज्यमंत्री (महसूल) यांनी दिनांक २३/०२/१९९६ रोजी व तत्कालीन मा.मंत्री (महसूल) यांनी दिनांक ०३/०७/२००४ रोजी संस्थेस दिलेल्या स.नं. ४० ते ५८ मधील ज्या जमिनी संपादनापूर्वी / रिक्वीझिशनपूर्वी खाजगी मालकीच्या होत्या, त्या सर्व जमिनी कब्जेहक्काची किंमत वसूल करुन सदर संस्थेला कब्जेहक्काने परत देण्यात याव्यात व संस्थेला दिलेल्या जमिनीपैकी जी जमीन मुळची शासकीय (२१ एकर) आहे ती संस्थेकडून काढून घेऊन सरकार जमा करावी, असे आदेश पारीत केले.

त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिनांक २२/०७/२००८ रोजीच्या आदेशानुसार प्रस्तावाधीन २१ एकर जमीन शासन जमा करण्यात आली व २४-७७.० हे-आर (६० एकर) जमीन म्हारळ सहकारी सामुदायिक शेती संस्थेच्या नावे कब्जेहक्काने शेती या कारणासाठी भोगवटादार वर्ग-२ म्हणून नविन अविभाज्य सत्ता प्रकाराने मंजूर केली आहे. तदनंतर विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी दिनांक १४.१०.२००९ च्या आदेशान्वये सदर जमीन मे.रिजन्सी निर्माण लि., उल्हासनगर यांना अकृषिक प्रयोजनार्थ विक्री करण्यास परवानगी दिली.

मौजे म्हारळ, ता. उल्हासनगर येथील स.नं.५३/५/अ एकुण क्षेत्र ७-८५-० हे. आर ही शासकीय जमीन सद्यस्थितीत महाराष्ट्र शासनाच्या नावे दाखल सदर जागेवर अतिक्रमण झालेले नाही. तसेच सदर जमीन विकासकाच्या ताब्यात नसून शासनाच्या ताब्यात आहे.

सदरहू प्रकरणी अभिलेख पाहता, अभिलेखे गहाळ होणे, बनावट अर्ज व बनावट म्हणणे ग्राहय धरणे व बनावट आदेश देणे अशा बाबी निदर्शनास आलेल्या नाहीत.

आर्वी मौजा तळेगांव (ता.आष्टी, जि.वर्धा) येथे सिट्रस इस्टेट कामास विलंब झाल्याबाबत

(१९) ४३८४६ (१३-०४-२०२२). श्री.दादाराव केचे (आर्वी) : सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा तळेगांव (ता.आष्टी, जि.वर्धा) येथे फळरोप वाटीकेच्या जागेवर सिट्रेस इस्टेट स्थापन करण्यास शासनाने दिनांक ७ मार्च, २०१९ च्या परिपत्रकानुसार मान्यता देण्यात आली असून त्यानुसार दिनांक ४ फेब्रुवारी, २०२० रोजी वा

त्यासुमारास ३ कोटी इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, सदर सिट्रेस इस्टेट योजना राबविण्याकरिता कंपनी कायदा २०१३ व सहकारी संस्था अधिनियम अंतर्गत नोंदणी करण्यात आलेली नसून सिट्रेस इस्टेट मध्ये अद्यापही कोणत्याही समित्यांची स्थापना सुध्दा करण्यात आलेली नसून योजनेसाठी नविन लेखाशिर्ष उघडण्यात आलेले नाही, तसेच मनुष्यबळास मान्यता देण्यात आलेली नसून अद्यापही कार्यवाही करण्यात आलेली नाही व सिट्रेस इस्टेटच्या प्रशासकीय बाबी पूर्ण करण्यात आलेल्या नाही, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच नागपूर व अमरावती जिल्ह्यातील सिट्रेस सेंटर सुरू करण्यात आले असून शासन वर्धा जिल्ह्यातील तळेगांव येथील सिट्रेस सेंटर सुरू करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक २४ जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास पत्राची दखल घेण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत विदर्भातील संत्रा व मोसंबी या पिकांचे उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये निराशा पसरलेली असल्यामुळे सर्व बाबींना विलंब करणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवर शासन कार्यवाही करून कामास सुरूवात करणार आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संदीपानराव भुमरे (१८-०८-२०२२) :(१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.

तळेगांव ता.आष्टी, जि.वर्धा या सिट्रस इस्टेटची नोंदणी पूर्ण झालेली आहे. तसेच कार्यकारी समितीची स्थापना करण्यात आली आहे. तसेच सदर इस्टेटच्या पुढील कामाकरिता बँक ऑफ इंडीया, तळेगांव (शा.पं) येथे बँकेचे खाते उघडण्यात आले आहे.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) सहा. धर्मादाय आयुक्त सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय वर्धा यांचे सिट्रस नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाले असल्यामुळे पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

पुणे जिल्ह्यातील गृहनिर्माण संस्थांवर ब्रिटीश काळातील अकृषिक कर जमा करण्याबाबत

(२०) ४४५१० (२४-०५-२०२२). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील गावठाण क्षेत्र वगळता सर्व गृहनिर्माण संस्था, वाणिज्य, औद्योगिक वापर असणाऱ्या संस्थांना सन १९९६-९७ या कालावधीपासूनचा प्रलंबित कर दंडाच्या रकमेसह त्वरीत जमा करण्याची नोटीस दिल्याने गृहनिर्माण संस्थांवर ब्रिटीश काळातील अकृषिक कर भरावा लागल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत महानगरपालिका कर आणि अकृषिक कर असे दोन कर कोणत्या कारणास्तव भरायचे असा प्रश्न जिल्ह्यातील उपरोक्त संस्थांमार्फत उपस्थित करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अकृषिक कराबाबत शासनाने निर्णय घेऊन त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०७-१०-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

पुणे जिल्ह्याकरीता दिनांक २७/१२/२००१ च्या अकृषिक आकारणीच्या दरात सुधारणा करण्यात आली. दिनांक २६/०४/२०१० रोजी मंत्रालयीन स्तरावरुन सुधारित अकृषक आकारणीचे दराप्रमाणे वसुलीस स्थगिती देण्यात

आली. सदर स्थगिती ०५/०२/२०१८ चे शासन परिपत्रकानुसार उठविण्यात येवून नव्याने अकृषिक आकारणी निश्चित करण्याचे निर्देश दिले. त्याप्रमाणे दिनांक २९/०१/२०२१ रोजी जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडून प्रसिद्ध केलेल्या राजपत्रानुसार अकृषिक आकारणीचे दर सुधारीत करण्यात आले आहेत.

दिनांक २९/०१/२०२१ रोजीच्या राजपत्रानुसार नागरी क्षेत्रातील समाविष्ट असलेल्या महसूल भागनिहाय प्रति चौ.मी. अकृषिक आकारणीचा दिलेल्या प्रमाण दरानुसार निवासी, औद्योगिक व वाणिज्य वापराबाबत अकृषिक आकारणी करुन संबधितांना तहसिलदार पुणे शहर/गाव कामगार तलाठी यांचे कार्यालयाकडून मागणी नोटिस देण्यात आलेली आहे. सदरची मागणी नोटिस ही सन १९९६-२००१, २००१-२०११ व २०११-२०२१ या कालावधीकरीता निश्चित करून प्रसिद्ध करण्यात आलेल्या राजपत्रातील दरानुसार अकृषिक आकारणीची रक्कम नमुद केलेली आहे. तलाठ्यांमार्फत डिमांड नोटिस देत असताना यापूर्वी ज्या खातेदारांनी अकृषिक कर भरला आहे त्या खातेदारांची कर भरल्याची पावती तपासून सदरची रक्कम ही मागणी नोटिस मधून वगळून सुधारीत मागणी नोटीस ही देणेत आली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) पुणे जिल्हयातील पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि १२ नगरपरिषदेच्या हद्दीतील नागरी क्षेत्रांकरीता शासन परिपत्रक, दिनांक ०५ फेब्रुवारी, २०१८ मधील दिलेल्या दिशा-निर्देश व महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १११ ते ११४ मधील तरतूदीनुसार ०१ ऑगस्ट १९९६ ते ३१ जुलै २०२१ या कालावधीसाठी महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक-असाधारण पुणे विभागीय पुरवणी, २९ जानेवारी, २०२१ अन्वये अकृषिक दर निश्चित करून प्रसिध्द करणेत आले होते, परंतू शासनाकडील पत्र क्र.एनएपी-२०२२/प्र.क्र.५०/ज-१अ, दिनांक ०७/०४/२०२२ अन्वये दिनांक ०५ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या शासन परिपत्रकात नमूद केलेल्या दिशा निर्देशाप्रमाणे क्षेत्रीय स्तरावर करण्यात येणाऱ्या अकृषिक कराच्या आकारणीच्या वसूलीस पुढील आदेश होईपर्यंत तात्पुरती स्थगिती देण्यात आली आहे.

तसेच शासन निर्णय क्र.एनएपी-२०२२/प्र.क्र.५०/ज-१अ, दि.०६/०६/२०२२ अन्वये, अकृषिक कराच्या आकारणीच्या वसूलीसंदर्भात शासनाची भूमिका ठरविण्यासाठी अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास समिती नियुक्ती करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अंबरनाथ (जि.ठाणे) येथील कुशिवली धरण भूसंपादन प्रक्रियेत बनावट कागदपत्रांच्या आधारे झालेला गैरव्यवहार

(२१) ४४५४३ (२८-०६-२०२२). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) येथील कुशीवली धरणातील भूसंपादन प्रक्रियेत बोगस व मृत प्रकल्पग्रस्तांच्या नावे बनावट कागदपत्रांच्या आधारे कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे दिनांक २५ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी पोलीस स्टेशनमध्ये गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे काय, तसेच गैरव्यवहार करणाऱ्या आरोपींना अटक करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी स्थापन केलेल्या त्रिसदस्यीय समितीचे निष्कर्ष काय आहेत,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२२-०८-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) त्रिसदस्यीय समितीची स्थापना करण्यात आली नाही परंतु, उपविभागीय अधिकारी उल्हासनगर यांचे पत्र क्र.उपविअ/भूसं/कुशिवली लघूपाटबंधारे योजना/कावि/२३/२०२२ दिनांक १३.०५.२०२२ अन्वये मंडळ अधिकारी, कुंभाली व तलाठी सजा वाडी यांना चौकशी करुन वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले.
(४) उपविभागीय अधिकारी यांचे निर्देशानुसार तहसिलदार अंबरनाथ यांचेकडून दिनांक ०६.०६.२०२२ रोजी संयुक्तीक चौकशी अंती अहवाल सादर करण्यात आला. त्यानुसार "संपादीत क्षेत्राची मूळ खातेदार यांचे नावे घोषित झालेली मोबदल्याची रक्कम त्रयस्थ व्यक्तींकडून ते स्वत: खातेदार असल्याचे भासवून उपविभागीय अधिकारी उल्हासनगर यांचे कार्यालयाची व मूळ सातबारा सदरी दाखल खातेदार यांची फसवणूक करीत असल्याचे निदर्शनास आले. त्यानुषंगाने एकुण २३ सर्वे नंबरमध्ये वाटप करण्यात आलेल्या भूसंपादन मोबदल्याच्या अनुषंगाने मध्यवर्ती पोलीस ठाणे, उल्हासनगर येथे एकूण ५ फिर्याद दाखल करण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील लाखो शेतकरी प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेपासून वंचित राहिल्याबाबत

(२२) ४४५५७ (२८-०६-२०२२). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती नमिता मुंदडा (केज), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शेतकऱ्यांच्या उत्पन्न वाढीसाठी सुरु असलेली प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेच्या अंमलबजावणीत आलेल्या त्रुटींमुळे अनेक पात्र शेतकरी या लाभापासून वंचित झाले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेंतर्गत पात्र ठरण्यासाठी शेतकऱ्यांना दिनांक ३१ मार्चपर्यंत ई-केवायसीच्या माध्यमातून माहिती भरुन पाठविणे बंधनकारक असताना पोर्टलमधील बिघाड, नेटवर्क नसणे, अनेक तांत्रिक अडचणी तसेच शासकीय यंत्रणेच्या निष्काळजीपणामुळे हा तपशिल न भरता आल्यामुळे सुमारे ८.५ लक्ष पात्र शेतकरी या योजनेच्या लाभापासून वंचित राहिले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळण्यासाठी उपरोक्त अडचणी दुर करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार या योजनेच्या अंमलबजावणीतील अडचणी दुर करण्यासंदर्भात तसेच जबाबदार अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अब्दुल सत्तार (२२-०८-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे.

क्षेत्रीय स्तरावर योजनेच्या कामकाजावर महसूल, ग्रामविकास व कृषि विभागाच्या काही संघटनांनी बहिष्कार टाकल्यामुळे लाभार्थ्यांची डाटा दुरुस्ती, भौतिक तपासणी, स्वयंनोंदणीस मान्यता देणे व इतर बाबींचे कामकाज प्रलंबित राहिल्याने असे लाभार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहिले आहेत.
(२) हे, खरे नाही.

पी.एम.किसान पोर्टलवरील नोंदणीकृत पात्र लाभार्थ्यांची e-KYC करण्यासाठी लाभार्थ्यांना OTP किंवा बायोमॅट्रिक हे पर्याय केंद्र शासनाने उपलब्ध करून दिलेले आहेत. त्यानुसार सदर e-KYC पुर्ण करण्यासाठी विशेष जनजागृती मोहिम राबवून दिनांक ३१ मार्च, २०२२ अखेर पर्यंत e-KYC पुर्ण करण्याबाबत केंद्र शासनाच्या सुचना प्राप्त झाल्या होत्या तथापि केंद्र शासनाच्या दिनांक १९/०५/२०२२ रोजीच्या पत्रान्वये e-KYC पुर्ण करण्यास दिनांक ३१ जुलै २०२२ अखेर मुदतवाढ देण्यात आलेली असून सर्व नोंदणीकृत लाभार्थ्यांना e-KYC प्रमाणिकरणाची प्रक्रिया बंधनकारक करण्यात आली आहे. दिनांक १२.०८.२०२२ पर्यंत एकुण ६३.१८ लाख लाभार्थ्यांचे e-KYC प्रमाणिकरण पुर्ण झाले असून उर्वरीत काम प्रगतीपथावर आहे.

(३) मा.मंत्री, महसूल व मा.मंत्री, कृषि यांच्या उपस्थितीत दिनांक २१/०९/२०२१ रोजी आयोजित बैठकीमध्ये परिपत्रक किसयो क्र.२०१९/प्र.क्र.२०/११अे, दिनांक ०४ फेब्रुवारी, २०१९ व शासन निर्णय क्र.किसयो-२०१९ /प्र.क्र.२०/भाग-४/११अे, दिनांक १५ फेब्रुवारी, २०१९ नुसार सर्व यंत्रणांनी समन्वयाने कामकाज करावे असे निर्देश देण्यात आले आहेत.

तसेच दिनांक २० जानेवारी, २०२२ रोजी मा.मुख्य सचिव महोदयांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत प्राप्त सूचनांनुसार प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत प्रलंबित डेटा दुरुस्तीसाठी कॅम्पचे आयोजन करणे, योजनेतील लाभार्थ्यांची भौतिक तपासणी करणे व अपात्र ठरलेल्या लाभार्थ्यांकडून दिलेला लाभ वसूल करण्याबाबत शासन परिपत्रक दिनांक २२ फेब्रुवारी, २०२२ नुसार कामकाज करण्याबाबत सूचना निर्गमित केल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्नच उद्भवत नाही.

मुंबई (वांद्रे पश्चिम) बँडस्टँड येथील शासकीय मालकीचा भूखंड रुस्तमजी बिल्डरला विकल्याबाबत

(२३) ४४५६४ (२८-०६-२०२२). श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई (वांद्रे पश्चिम) येथील बँडस्टँड येथील द बांद्रा पारसी कन्व्हलसन्ट होम फॉर वूमेन ॲन्ड चिल्ड्रेन चॅरिटेबल ट्रस्ट या धर्मादाय संस्थेला नर्सिंग होम बांधण्यासाठी भाडेपट्टयावर देण्यात आलेला शासकीय मालकीचा १ एकर ५ गुंठे भूखंड परस्पर भूखंड रुस्तमजी बिल्डरला विक्री करुन सुमारे १००० कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे दिनांक ६ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भूखंडाचा भाडेपट्टा १९८० साली संपुष्टात येवूनही हा भूखंड शासनाने ताब्यात घेतला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात गैरव्यवहारास स्थगिती देवून हा भूखंड शासनाने ताब्यात घेवून या प्रकरणाची चौकशी एसआयटीमार्फत करण्याची मागणी तत्कालीन विरोधी पक्षनेता, विधानपरिषद यांनी तत्कालील मुख्यमंत्री यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने प्रस्तुत प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१७-०८-२०२२) : (१) ते (४) मौजे वांद्रे, ता.अंधेरी, मुंबई उपनगर जिल्ह्यातील बांद्रा पारसी कन्वलसेंट होम फॉर वूमेन ॲन्ड चिल्ड्रेन चॅरिटेबल ट्रस्ट यांना भाडेपट्टयाने मंजूर केलेली, भूखंड क्र.२०२, न.भू.क्र. बी-८९५ मधील ५०८१ चौ.वार (४२४८.४ चौ.मी.) जमिनीवरील शर्तभंगाबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी सुनावणीअंती दिनांक २४/०६/२०२१ रोजी आदेश पारीत करुन शर्तभंग नियमानुकूल करुन दिलेला आहे.

तसेच जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक २४/०६/२०२१ रोजीच्या आदेशान्वये शासनाच्या प्रचलित धोरणानुसार शासन निर्णय, दिनांक १२/१२/२०१२ मधील तरतुदीनुसार भाडेपट्टयाचे नुतनीकरण करुन दिलेले आहे. तसेच

भाडेपट्टेदार संस्थेची विनंती विचारात घेऊन, शासन अधिसूचना, दिनांक ०८/०३/२०१९ मधील तरतुदीनुसार, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी सदर जमीन, दिनांक १४/१०/२०२१ रोजीच्या आदेशानुसार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करण्याचे आदेश पारीत केले आहेत.

सदर आदेशानुसार शासन अधिसूचना, दिनांक ०८/०३/२०१९ रोजीच्या अधिसूचनेमध्ये नमूद केलेल्या दराने रुपांतरण शुल्काची रक्कम शासन जमा झालेली आहे. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे दिनांक १४/१०/२०२१ रोजीचे आदेश तत्का. मा.मंत्री (महसूल) यांनी स्वाधिकारे पुनरीक्षणाकरिता घेतले होते. त्यानुषंगाने तत्का. मा.मंत्री (महसूल) यांनी संबंधितांना सुनावणीची संधी देऊन, दिनांक २३/०६/२०२२ रोजी आदेश पारीत केले आहेत. सदर आदेशानुसार जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे दिनांक १४/१०/२०२१ रोजीचे आदेश हे प्रचलित कायदे व नियम यांचेशी सुसंगत असल्याचे आदेशित करुन पुनरीक्षणाची कार्यवाही रद्द केलेली आहे.

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी भाडेपट्टयाने दिलेली जमीन विक्री करण्यास ट्रस्टला परवानगी दिलेली नसून, शासनाच्या प्रचलित धोरणानुसार सदर जमीन वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करण्यास परवानगी दिलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

नांदेड येथील प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक यांची भरदिवसा गोळया घालून केलेली हत्या

(२४) ४४६४५ (२८-०६-२०२२). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.रवि राणा (बडनेरा), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड येथे प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक श्री.संजय बियाणी यांची योग्य सुरक्षा व्यवस्था न ठेवल्यामुळे भरदिवसा दिनांक ५ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास गोळया घालून हत्या करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) तसेच बीड जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागातील एका अधिकाऱ्याने कंत्राटदाराकडून येणाऱ्या धमक्यांमुळे बंदूक पुरविण्याची मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, तसेच दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०८-२०२२) :(१) नांदेड येथील बांधकाम व्यावसायिक श्री.संजय बियाणी यांची दिनांक ०५.४.२०२२ रोजी गोळया घालून हत्या करण्यात आली. दिवंगत बियाणी यांना संघटित गुन्हेगारांकडून जीवे मारण्याच्या धमक्या येत असल्याने दिनांक ०२.६.२०१९ पासून त्यांना दिवसा व रात्री दोन नि:शुल्क सशस्त्र पोलीस अंमलदारांचे संरक्षण पुरविण्यात आले होते.

याबाबत जिल्हास्तरीय सुरक्षा समितीने दिनांक १३.७.२०२० रोजी घेतलेल्या निर्णयानुसार दिवंगत बियाणी यांना पोलीस संरक्षणाची आवश्यकता असल्यास सशुल्क संरक्षण घेण्याबाबत दिनांक १६.७.२०२० रोजी लेखी कळविण्यात आले असता त्यास त्यांनी संमती दर्शविलेली नव्हती.

जिल्हाधिकारी, नांदेड कार्यालयाकडून दिनांक ३१.१२.२०१९ अन्वये रिव्हॉल्वर बाळगण्याचा परवाना मिळाल्याच्या अनुषंगाने दिवंगत बियाणी यांनी स्वसंरक्षणार्थ रिव्हॉल्वर खरेदी केलेली होती.
(२) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई, बीड यांनी कंत्राटदाराकडून येणाऱ्या धमक्यांमुळे बंदूक पुरवण्याची मागणी जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे केली आहे.

अंबाजोगाई पोलीस स्टेशन येथे सदर कार्यकारी अभियंत्यावर गु.र.नं.२७४/२०२२, भा.दं.वि. कलम ७ अन्वये रस्ता दुरुस्तीच्या कामाचे बिल पारीत करण्याकरीता लाच मागितल्या प्रकरणी गुन्हा दाखल असल्याने त्यांनी

आत्मसंरक्षणाकरीता मागणी केलेला शस्त्र परवाना त्यांना न देण्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी, बीड यांना पोलीस अधीक्षक, बीड यांनी सादर केला आहे.

(३) दिवंगत बियाणी हे रहात असलेल्या हद्दीतील पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षकांनी दिलेल्या अहवालानुसार दिवंगत बियाणी यांना दोन सशस्त्र पोलीस अंमलदारांचे संरक्षण पुरविण्यात आले होते. तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांच्याकडून दिनांक ३१.१२.२०१९ रोजीच्या आदेशान्वये दिवंगत बियाणी यांना रिव्हॉल्वर बाळगण्याचा परवाना देण्यात आला होता.

पोलीस अधीक्षक यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय सुरक्षा समितीने दिनांक १३.७.२०२० रोजीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार दिवंगत बियाणी यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडून स्वसंरक्षणार्थ शस्त्र परवाना मिळवून शस्त्र खरेदी केले असल्याने व त्यांची आर्थिक परिस्थिती चांगली असल्याने सशुल्क पोलीस संरक्षण देण्याचा निर्णय घेतला होता. याबाबत दिवंगत बियाणी यांनी शुल्कही भरणा केले नाही व त्यांनी पोलीस संरक्षण मिळण्याची मागणीही केलेली नव्हती. दिवंगत बियाणी यांच्या हत्या प्रकरणी अपर पोलीस अधीक्षक, भोकर, जिल्हा नांदेड यांच्या अधिपत्याखाली विशेष तपास पथक (एस.आय.टी.) स्थापन करण्यात आले आहे.

या प्रकरणी आरोपींवर विमानतळ पोलीस ठाणे, नांदेड येथे गु.र.नं.११९/२०२२, भा.दं.वि. कलम ३०२, ३०७ व ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात येऊन एकूण १५ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. सध्या सर्व आरोपी न्यायदंडाधिकारी कस्टडी रिमांड मध्ये कारागृहात आहेत.

सदर गुन्ह्याचा अधिकचा तपास सुरु असून निष्कर्षानुसार गुन्ह्यात भा.दं.वि.कलम १२०(ब), २०१ समाविष्ट करण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम, १९९९ मधील कलम ३(१)(i)(ii), ३(२), ३(४) चा समावेश करण्यात आला आहे.

(४) विलंब झालेला नाही.

पुणे शहरात सायबर गुन्ह्यांमध्ये वाढ होत असल्याबाबत

(२५) ४४६६९ (२८-०६-२०२२). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.रवि राणा (बडनेरा), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे व पिंपरी-चिंचवड शहरात सायबर गुन्हे वेगाने वाढल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुण्यात सन २०१९ या कालावधीत साडेसात हजार सायबर गुन्हे अर्जांची नोंद झाली असताना हीच संख्या सन २०२१ या कालावधीत १९ हजारांवर गेली असतानाही प्रत्यक्षात दोनशे ते तीनशेच गुन्हे दाखल झाले असून स्थानिक पोलीस ठाण्यांकडून गुन्हे दाखल करण्यास टाळाटाळ होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर सायबर गुन्ह्यांच्या तपासाकरिता स्वतंत्र पोलीस ठाणे नसल्याने तसेच अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे चौकशीस विलंब होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०८-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) सायबर पोलीस ठाण्यांकडे प्राप्त तक्रार अर्जातील आरोपीची तांत्रिक माहिती प्राप्त करून असे अर्ज संबंधित अर्जदार ज्या पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात राहण्यास आहे, त्यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येतात. तसेच गंभीर आणि संवेदनशील तांत्रिक गुंतागुंत असल्यास सायबर पोलीस ठाण्यात गुन्हे नोंदवून त्याचा तपास सायबर पोलीस

ठाण्यामार्फत केला जातो. त्यामुळे गुन्हे दाखल करण्यास टाळाटाळ केली जाते, ही बाब खरी नाही.
(३) व (४) पोलीस आयुक्त, पुणे शहर यांच्या दिनांक ९ ऑगस्ट २०२२ च्या स्थायी आदेशान्वये, सायबर गुन्ह्यांना प्रभावीपणे प्रतिसाद देण्यासाठी, पुणे शहरातील सर्व पोलीस ठाण्यांमध्ये सायबर गुन्हे प्रतिबंधक कक्ष पोलीस ठाणे निहाय/परिमंडळ निहाय सायबर गुन्हे तपास व प्रतिबंधक कक्ष" स्थापन करण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

तारकर्ली (ता.मालवण, जि.सिंधुदूर्ग) येथील समुद्रकिनारी "गजानन कृपा" ही स्कुबा डायव्हींग बोट उलटून दोन पर्यटकांचा मृत्यू झाल्याबाबत

(२६) ४४६७९ (२३-०६-२०२२). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारकर्ली (ता.मालवण, जि.सिंधुदूर्ग) येथील समुद्रकिनारी "गजानन कृपा" ही स्कुबा डायव्हींग बोट उलटून २६ पर्यटकांपैकी दोन पर्यटकांचा दिनांक २४ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास मृत्यू झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पर्यटकांना लाईफ जॅकेटस देण्यात आले नव्हते तसेच येथे वॉटर स्पोर्ट करणा-या बोटींच्या सुरक्षा विषयक त्रुटी वेळोवेळी तपासण्यात येत नसल्यामुळे अशा घटना वारंवार घडत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करुन सिंधुदूर्ग जिल्ह्यातील सर्व पर्यटन स्थळांवर पर्यटकांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून वॉटर स्पोर्ट करणा-या सर्व बोटींचे सुरक्षा विषयक परिरक्षण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०८-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर घटनेवेळी पर्यटकांनी लाईफ जॅकेट परिधान केल्याचे दिसून आले नव्हते.
वॉटर स्पोर्ट करणाऱ्या सर्व बोटींचे सुरक्षा विषयक परिक्षण हे सागरी अभियंता व चीफ सर्व्हेअर महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड मुंबई यांचेकडून करण्यात येते. अशा प्रकारच्या घटना यापुर्वी सन २०१९ साली ०१, सन २०२० साली ०१ अशा एकूण ०२ घटना घडलेल्या आहेत.
(३) सदर घटनेच्या अनुषंगाने मालवण पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि. नं.७३/२०२२ कलम ३०४(अ), ३३६, ३३७, २८०, २८२, ३४ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बोटीचे मालक व सदर घटनेस जबाबदार असलेले असे एकूण ७ आरोपींना अटक करण्यात आली आहे.
सदर अनधिकृत बोटीची नोंदणी न केल्याबाबत संबंधित बंदर निरीक्षक यांचेवर बंदरे विभागामार्फत कारवाई करण्यात आली आहे.
नोंदणीकृत बोटींची प्रवासी क्षमता, बोटीची स्टॅबीलीटी ही नेव्हल आर्किटेक्ट प्लॅन नुसार ठरविण्यात येते. प्रतिवर्षी सदर बोटींचे सर्वेक्षण करण्यात येते. सर्वेक्षणामध्ये बोटीची सद्यस्थिती, त्यावरील लाईफ जॅकेट, रिंग बॉय, अग्निशामक उपकरणे, नियमानुसार आवश्यक कर्मचारी यांची तपासणी करण्यात येते. तसेच वॉटर स्पोर्ट करणा-या सर्व बोटींचे सुरक्षा विषयक परिक्षण सागरी अभियंता व चीफ सर्व्हेअर महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड, मुंबई यांचेकडून करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

सिंधुदूर्ग जिल्ह्यातील विजयदूर्ग बंदर विकसित करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

(२७) ४४७०८ (२८-०६-२०२२). अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.सुनील राणे (बोरीवली) : सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदूर्ग जिल्हयातील विजयदूर्ग बंदराला आंतरराष्ट्रीय दर्जाचे बंदर करण्यासाठी केंद्र शासनाने मंजुरी दिली असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विजयदूर्ग बंदराची भौगोलिक परिस्थिती जीएनपीटी आणि मुंबई पोर्ट यांच्याप्रमाणे उद्योगासाठी सक्षम असूनही सदर बंदर विकसित करण्यासाठी अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बंदरावरील उद्योग बंद असल्यामुळे स्थानिकांना रोजगारापासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत सिंधुदूर्ग जिल्ह्याच्या पर्यटन उद्योग वाढीसाठी तसेच रोजगार निर्मितीसाठी विजयदूर्ग बंदाराच्या विकासासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (१७-०८-२०२२) : (१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) विजयदूर्ग बंदराच्या विकासासाठी खाजगी विकासक कंपनीशी दिनांक २८/३/२००८ रोजी ५० वर्षांचा सवलत करारनामा स्वाक्षांकित करण्यात आला होता. परंतु, विकासकाने बंदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी कोणतीही भरीव प्रगती न केल्यामुळे सदरचा सवलत करारनामा दिनांक ७/११/२०१९ रोजीच्या पत्रान्वये संपुष्टात आणण्यात आला.

महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या संचालक मंडळाच्या दिनांक ७/४/२०२२ रोजी संपन्न झालेल्या ७६ व्या बैठकीत, बंदर विकासकाची नव्याने निवड करण्यास व त्यासाठी निविदा मागविण्यास मंजूरी देण्यात आली आहे.

अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील खाडीलगत सुरु असलेल्या प्रकल्पामुळे भराव टाकून खाड्या बुजविण्यात येत असल्याबाबत

(२८) ४४८०० (०२-०७-२०२२). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील खाडीलगत सुरु असलेल्या वेगवेगळया बांधकाम वा इतर प्रकल्पामुळे भराव टाकून खाड्या बुजवून टाकण्यात येत असल्याचे माहे मे,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच रेवस बंदराजवळील ५० कोटींच्या भरावाच्या प्रकरणानंतर निसर्ग सौंदर्याने बहरलेली नागाव-चौल परिसरातील बागमळा खाडी ही उद्योगपती हिरानंदानी संचालक असलेले मे.डायनामिक्स व्हेकेशन्स कंपनी मातीचा भराव टाकून बुजवित असल्याच्या तक्रारी ग्रामस्थांनी जिल्हा उपविभागीय अधिकारी यांच्याकडे करुन याबाबत जिल्हा किनारा आपत्ती प्राधिकरणाने चौकशी करुन कंपनी विरोधात गुन्हा दाखल करावा अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तसेच ग्रामस्थांच्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२२-०८-२०२२) : (१) नाही.

(२), (३) व (४) याबाबत श्री.संजय गंगाराम सावंत यांनी उप विभागीय अधिकारी, अलिबाग यांना दिनांक १८.०५.२०२२ रोजी तक्रार दाखल केली असून सदर तक्रारीच्या अनुषंगाने तहसिलदार, अलिबाग यांचेमार्फत चौकशी करण्यात आली असून मंडळ अधिकारी, नागांव, तलाठी सजा नागांव व परिमंडळ वन अधिकारी नागाव यांचेमार्फत स्थळपहाणी नुसार सदर तक्रार अर्जामध्ये नमूद केलेल्या बाबींमध्ये तथ्य आढळून आलेले नाही. मात्र सदर क्षेत्रातून वाहत असलेल्या नाला/खाडीच्या दक्षिण बाजूस मातीचे ढिगारे व पूर्व पश्चिम दिशेस मातीचा साकव असून तो तात्पुरत्या स्वरुपाचा असून येत्या काही दिवसांत काढून टाकण्यात येणार आहे.

नाशिकरोड येथील मध्यवर्ती कारागृहात कैद्यांना संचित रजेवर सोडल्यानंतर मुदतीत कारागृहात न घेतल्याबाबत

(२९) ४४९१० (२८-०६-२०२२). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिकरोड येथील मध्यवर्ती कारागृहात शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांना संचित रजेवर सोडल्यानंतर मुदतीत कारागृहात न घेतल्याचे दिनांक २० एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मध्यवर्ती कारागृहातील तत्कालीन श्रेणी एकचे तुरुंग अधिकारी, श्रेणी दोनचे तत्कालीन तुरुंग अधिकारी व तत्कालीन वरिष्ठ लिपिक या तिघांनी मिळून कारागृहातील नोंदवहीमध्ये खाडाखोड करुन तसेच व्हाइटनर लावून शिक्षा वॉरंट न्यायाधीन कालावधी, माफीचे दिवस, बायो दिवस कालावधी या नोंदवहीवर खाडाखोड करित शिक्षाबंदी कैद्यांना बेकायदेशीर मुक्त केल्याचे आढळून आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी नाशिकरोड पोलीस ठाण्यात तिघांविरोधात कोणता गुन्हा दाखल करण्यात आला आहे व उक्त प्रकरणाचा तपास करण्यात आला आहे काय,
(४) असल्यास, सदर तपासानुसार संचित रजेवर सोडलेल्या कैद्यांना ताब्यात घेण्याबाबत तसेच संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०८-२०२२) : (१) सदर बाब खरी नाही.
(२) होय, हे खरे आहे. नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह येथील शिक्षा बंदी श्रीहरी राजलिंगम गुंटुका, व्यंकट रामलु व्यंकय्या व विलास बाबु शिर्के यांच्या शिक्षेसंबंधीच्या अभिलेखांमध्ये खाडाखोड करुन गैरप्रकार केले प्रकरणी अधीक्षक, जळगाव जिल्हा कारागृह यांनी प्राथमिक चौकशी करुन दिनांक ३०/०१/२०२२ रोजी चौकशी अहवाल सादर केला आहे. सदर चौकशी अहवालामध्ये बंदयांचे शिक्षेच्या अभिलेखामध्ये व्हाईटनरचा वापर केल्याचे, खाडाखोड केल्याचे, अभिलेखाची पाने फाडल्याचे तसेच खोडून त्यावर गिरविल्याचे दिसून आले आहे.
(३) सदर प्रकरणी दोषी श्री.शामराव आश्रुबा गिते, तु अ श्रेणी-१ श्री.माधव कामाजी खैरगे, तु अ श्रेणी-२ व श्री.सुरेश जयराम डाबेराव, वरिष्ठ लिपीक यांना दोषी ठरवून, त्यांचेविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ नियम ८ अन्वये शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित केली असून, त्यांना तात्काळ प्रभावाने निलंबित करण्यात आले आहे. तसेच त्यांच्याविरुध्द नाशिकरोड पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.११६/२०२२ कलम ४६७, ४६८, ४७१ सह ३४ प्रमाणे दिनांक २०/०४/२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(४) सदर प्रकरणातील कैद्यांना संचित रजेवर सोडण्यात आलेले नाही. त्यामुळे दोषींवर कारवाई करण्यात आलेली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्य कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन व गटशेती अंतर्गत शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन करुन विविध प्रकल्प उभारणीबाबतचे प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

(३०) ४५०१४ (३०-०६-२०२२). अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान व कृषी विकास प्रकल्प यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या राज्य कृषि व्यवसाय व ग्रामीण परीवर्तन (स्मार्ट) व गटशेती कार्यक्रमांतर्गत जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने स्थापन केलेल्या शेतकरी उत्पादक कंपन्याचे अनेक प्रस्ताव मोठ्या प्रमाणात शासनकडे प्रलंबित असल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शेतकरी उत्पादक कंपन्यांना शासनाकडून वेळेत मंजूरी व अनुदान प्राप्त न झाल्यामुळे तसेच शेतकरी गटांना बँकाकडून देखील कर्ज वाटप होत नसल्याने योजनेच्या अंमलबजावणीत अनेक अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शेतकरी उत्पादक कंपन्यांचे प्रस्ताव सत्वर निकाली काढून अनुदान मंजूर करण्याबाबत तसेच बेजबाबदार अधिकारी व कर्मचारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अब्दुल सत्तार (०६-०९-२०२२) : (१) व (२) मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पांमध्ये शेतकरी उत्पादक कंपन्याचे अनेक प्रस्ताव प्रलंबित आहे हे खरे नाही. मागील दोन वर्षापासून प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. प्रकल्पामध्ये प्राप्त FPP संख्या ३४९ असून त्यापैकी १४२ प्रस्तावांना मंजूरी देण्यात आलेली आहे. तसेच ६५ प्रस्तावांना मंजूरी प्रस्तावित आहे. या व्यतिरिक्त आणखी १०० उपप्रकल्पांना मंजूरी देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई व पुणे येथे वीज देयके भरण्यासाठी बनावट लिंक पाठवून वीज ग्राहकांची फसवणूक होत असल्याबाबत

(३१) ४५०४० (२८-०६-२०२२). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: मुंबई व पुणे येथे वीज देयक भरण्यासाठी बनावट लिंक पाठवून वीज ग्राहकांची फसवणूक करण्यात येत असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर टाटा पॉवरच्या नावाने संदेश पाठवून, लिंक वा अॅपवरुन देयक भरण्यास सांगून ग्राहकांची बँक खाती रिकामी करण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच बोरिवलीमध्ये टाटा पॉवरच्या दोन ग्राहकांची अशाचप्रकारे आर्थिक फसवणूक करण्यात आली असून त्यासंदर्भात बोरिवली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय आढळून आले, तसेच संबंधित कंपनीविरुध्द कारवाई करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-०८-२०२२) : (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) वीज देयके भरण्यासाठी बनावट लिंक पाठवून वीज ग्राहकांची फसवणूक होत असल्याबाबत बोरीवली पोलीस ठाणे येथे खालीलप्रमाणे दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
अ) गु.र.क्र.७०६/२०२२, भा.दं.वि. कलम ४२०, माहिती तंत्रज्ञान कायदा,२००० च्या कलम ६६(डी) अन्वये अनोळखी इसमाविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हा तपासाधीन आहे.
ब) गु.र.क्र.७०७/२०२२, भा.दं.वि. कलम ४२०, माहिती तंत्रज्ञान कायदा,२००० च्या कलम ६६(डी) अन्वये अनोळखी इसमाविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हा तपासाधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

खरवली (ता.महाड, जि.रायगड) येथे एका महिलेने सहा मुलांना विहिरीत ढकलून दिल्याबाबत

(३२) ४५०४३ (२८-०६-२०२२). श्री.संजय पोतनीस (कलिना) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) येथे बिरवाडीजवळील खरवली गावाच्या हद्दीत एका महिलेने आपल्या सहा लहान मुलांना विहिरीत ढकलून दिल्याची घटना माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान घडल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घटनेच्या संदर्भात महाड औद्योगिक पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०८-२०२२) : (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) सदर गुन्हयातील आरोपी महिलेस तिचा नवरा चारित्र्यावरुन संशय घेवून दारु पिऊन त्यांच्या लहान मुलांना व तिला मारहाण करीत असल्याने या त्रासाला कंटाळून आरोपी आईने तिच्या लहान सहा मुलांना विहिरीत ढकलून दिले. याबाबत आरोपीविरुध्द महाड औद्योगिक पोलीस ठाणे, जि.रायगड येथे गु.र.नं.७०/२०२२, भा.दं.वि. कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीस अटक करण्यात आले असून आरोपी न्यायालयीन कोठडीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

विले पार्ले (मुंबई) येथे एका टॅक्सीचालकास कोकेन विक्री करताना अटक केल्याबाबत

(३३) ४५२९५ (०२-०७-२०२२). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विले पार्ले (मुंबई) येथे विकास गर्जे या टॅक्सीचालकास कोकेन विक्री करताना गुन्हे शाखेच्या दहिसर युनिटच्या अधिकाऱ्यांनी अटक केली असल्याचे दिनांक ४ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर व्यक्तीकडून २० ग्राम वजनाचे सुमारे सहा लाख रुपये किंमतीचे उच्च प्रतीचे कोकेन आढळून आल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०८-२०२२) : (१) दिनांक ०१.०४.२०२२ रोजी कक्ष-१२, गु.प्र.शा., गु.अ.वि., मुंबई यांच्याकडून करण्यात आलेल्या कारवाईत विकास गर्जे या टॅक्सीचालकास कोकेन या अंमली पदार्थाची विक्री करताना अटक करण्यात आली आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणी आरोपिताविरूध्द गु.प्र.शा, वि.स्था.गु.र.क्र.०८/२०२२ कलम ८(क), २१(ब) एन.डी.पी.एस. कायदा, १९८५ (विलेपार्ले पो.ठा.गु.नों.क्र.२६०/२०२२) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून सदर आरोपिताविरूध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईमध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने छापा टाकून करुन अंमली पदार्थ जप्त केल्याबाबत

(३४) ४५३३३ (२९-०६-२०२२). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित झनक (रिसोड) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये कुरिअर कंपनीच्या नावाने ड्रग्स रॅकेट सुरु असून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दोन ठिकाणी छापेमारी करुन ४४५ ग्राम हायड्रोपोनिक अंमली पदार्थ आणि कोकेनसह २ लाख ९६ हजार रुपयांची रोख रक्कम जप्त केल्याचे दिनांक १० मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईतील एका पोस्ट कार्यालयामध्ये छापा टाकून २२५ ग्राम हायड्रोपोनिक अंमली पदार्थांचे कॅनडामधून आलेले पार्सल तसेच कुरिअरच्या माध्यमातून ड्रग्स आणल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०८-२०२२) : (१), (२) व (३) लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांच्याकडून सदर कारवाई करण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे रामपुरी-गेवराई (जि.बीड) येथील एका सहा वर्षाच्या मुलीवर झालेला लैंगिक अत्याचार

(३५) ४५५०७ (२८-०६-२०२२). श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे रामपुरी-गेवराई (जि.बीड) येथील एका सहा वर्षीय अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याचे दिनांक ०५ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच गेवराई मतदारसंघात अवैध गर्भपात प्रकरण, वाळू माफिया, शहरी व ग्रामीण भागात होत असलेल्या चोऱ्या या सर्व प्रकारांमुळे कायदा व सुव्यवस्थेची गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणातील आरोपींना अटक करण्यास, जलद शिक्षा होण्यासाठी न्यायालयापुढे पुरावे सादर करण्यास होणारा विलंब व त्यामुळे आरोपीच्या शिक्षेस होणारा विलंब यामुळे नराधमांचे मनोबल वाढत असून शक्ती कायदा लागू असताना अशा घटना घडत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त परिस्थिती निर्माण होण्यास जबाबदार असलेल्या प्रशासकीय यंत्रणेवर कोणाचेच नियंत्रण नसल्याने

असे प्रकार घडत असल्याचेही निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय
(५) असल्यास, प्रस्तुत घटनेतील आरोपींना शिक्षा होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०८-२०२२) : (१) सदर प्रकरणी पोलीस ठाणे, तलवडा येथे दिनांक ०५.०५.२०२२ रोजी गु.र.क्र.६८/२०२२ कलम ४५२, ३३६, ३६३, ३६६(अ), ३७६ (अ ब), ५०६, ३४ सह ४, ६, ८, १२, १७ पॉक्सो प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.
(२) उपविभाग गेवराई अंतर्गत पोलीस ठाणे येथे अवैध गर्भपात प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही तसेच गेवराई येथे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालेला नाही.
(३) हे खरे नाही.
(४) अशा प्रकारची कोणतीही बाब घडल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(५) सदरील प्रकरणातील एकूण दोन आरोपीस तात्काळ अटक करण्यात आली असून गुन्ह्यातील आरोपीविरुध्द दिनांक ०१.०७.२०२२ रोजी मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे गंगावाडी (ता.गेवराई, जि.बीड) येथील नियमबाह्य वाळूचे उत्खनन होत असल्याबाबत

(३६) ४५५२४ (२८-०६-२०२२). श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे गंगावाडी (ता.गेवराई, जि.बीड) येथील वाळू घाटाचा लिलाव ग्रामसभेच्या बोगस ठरावाच्या आधारे केला असल्याचे दिनांक ३१ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू ठिकाणी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून नियमबाह्य पध्दतीने व अनुज्ञेय मर्यादेपेक्षा जास्त वाळू उपसा केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच गेवराई येथील गोदावरी नदी पात्रात नियमांचे उल्लंघन करुन वाळूचे उत्खनन होत असल्यामुळे ए.एस.पी, बीड यांनी वाळू घाटावर जाऊन प्रत्यक्ष कारवाई करुन उत्खनन साहित्य जप्त केले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींच्या उपोषणामुळे वाळू घाटांवर सीसीटीव्ही कॅमेरे व वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांना जीपीएस प्रणाली बसवण्याच्या दिलेल्या सूचनांची अंमलबजावणी झाली नसल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार बोगस ठरावाच्या आधारे वाळू घाटांचा लिलाव करणाऱ्यांवर तसेच अवैधरित्या वाळू उपसा करणाऱ्यांवर मोक्काअंतर्गत कारवाई करण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२२-०८-२०२२) :(१),(२),(३),(४),(५) व (६)

जिल्हाधिकारी, बीड यांनी मौजे गंगावाडी-२ ता.गेवराई जि.बीड येथील वाळुघाटाची चौकशी करण्यास दिनांक ०३.०६.२०२२ अन्वये गठित करण्यात आलेल्या समितीच्या चौकशीमध्ये मौजे गंगावाडी-२ या वाळुघाटाबाबत ग्रामपंचायत गंगावाडी यांनी ग्रामसभा मासिक सभेमध्ये ठराव झाला नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी, बीड यांनी संबंधीत दोषी अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कार्यवाही करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांना दिनांक १७.०६.२०२२ रोजी कळविले असून त्यानुषंगाने कार्यवाही सुरू आहे.

तसेच, चौकशी समितीस मौजे गंगावाडी-२ या वाळुघाटातून लिलावधारकास मंजूर ४७७० ब्रास वाळुसाठयापैकी ६३० ब्रास वाळु उत्खनन केले असल्याचे आढळून आले असून मंजूर परिमाणापेक्षा जास्त वाळुचे

उत्खनन केल्याचे निदर्शनास आले नाही.

गेवराई तालुक्यातील मौजे संगमजळगाव-२ येथील वाळुघाटावर ए.एस.पी.बीड यांनी दिनांक ०१.०५.२०२२ रोजी केलेले कारवाई वेळी आढळून आलेल्या ०२ पोकलेल, ०१ जेसीबी व ८ टॅक्टर (रेतीसह) या वाहनावर उपविभागीय अधिकरी, बीड यांनी महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४८ (७) व कलम ४८ (८) अन्वये संबधीतांना दिनांक १५.०७.२०२२ रोजी दंडात्मक नोटीस बजाविण्यात आली आहे.

गेवराई तालुक्यातील लिलावात गेलेल्या वाळुघाटावर लिलावधारकाकडून सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आल्याचे अहवाल जिल्हाधिकरी बीड यांना प्राप्त झाले असून वाळु वाहतुक करणाऱ्या वाहनांवर जीपीएस यंत्रणा बसविण्याची कार्यवाही सुरू आहे.

गंगाखेड-पूर्णा-पालम (जि.परभणी) येथील शेतक-यांना खरिप पिकविमा मंजूर असतानाही परतावा न मिळाल्याबाबत

(३७) ४५५७४ (२८-०६-२०२२). डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गंगाखेड-पूर्णा-पालम (जि.परभणी) येथील शेतक-यांना सन २०२० या कालावधीचा खरिप पिकविमा मंजूर असून शेतक-यांना अद्यापही त्याचा परतावा मिळालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू पिक विमा न मिळाल्याने शेतक-यांवर उपासमारीची वेळ आली असून, थकीत खरिप पिक विमा सन २०२० या कालावधीत तातडीने मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (गंगाखेड) यांनी तत्कालीन कृषी मंत्री, महाराष्ट्र राज्य व जिल्हा कृषी अधिकारी, परभणी यांना दिनांक ९ जून, २०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पीक विम्याची रक्कम व दुष्काळी अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याच्या मागणीसाठी शेतक-यांनी माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान खानापूर फाटा येथे रास्ता रोको आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने शेतकऱ्यांना खरिप हंगामातील पीकविमा व दुष्काळी अनुदान देण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अब्दुल सत्तार (२२-०८-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे.

खरीप २०२० हंगामात गंगाखेड-पूर्णा-पालम (जि.परभणी) येथील ८०,०५५ एकूण रु.६० कोटी नुकसान भरपाई देय असून त्यापैकी ४२८२६ शेतकऱ्यांना रक्कम रु.२० कोटी रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आली आहे. उर्वरित शेतकऱ्यांना वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

(२) हे खरे आहे.

खरिप पिक विमा २०२० मिळण्याबाबत मा.श्री.रत्नाकर गुट्टे, वि.स.स. यांचे निवेदन प्राप्त झाले असून प्रकरणाची वस्तुस्थिती मा. सदस्यांना कळविण्यात आलेली आहे.

(३) हे खरे आहे.

(४) खरीप २०२० हंगामात स्थानिक नैसर्गिक आपत्ती मुळे विमाधारक शेतकऱ्यांच्या पिकाचे नुकसान झाले. मात्र कोविड २०१९ ची लाक्षणिक परिस्थितीमध्ये विविध कारणांमुळे विमाधारक शेतकरी संबंधित कंपनी नुकसानीबाबत सूचना देऊ शकले नाहीत. यास्तव पिकांच्या नुकसानीबाबत NDRF मध्ये झालेले पंचनामे गृहीत धरून शेतकऱ्यांना विमा नुकसान भरपाई देणे बाबत राज्य शासनाने विमा कंपन्यांकडे आग्रही भूमिका ठेवली आहे. याबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरावा सुरू आहे.

तसेच मा.मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय पिक विमा समन्वय समितीच्या दिनांक १७.१२.२०२१ बैठकीमध्ये सर्व विमा कंपन्यांना नुकसान भरपाई ही NDRF चे पंचनामे गृहीत धरुन अदा करणेबाबत कळविण्यात आले

आहे.

सन २०२० च्या खरीप हंगामात परभणी जिल्हयातील कोणत्याही तालुक्यात दुष्काळ जाहिर करण्यात आला नाही. त्यामुळे दुष्काळी अनुदान देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

मौ.माळवाकद (ता.महागांव, जि.यवतमाळ) येथील गावकऱ्यांच्या अत्याचाराला कंटाळून पारधी समाजाच्या कुटुंबियांना गाव सोडून जावे लागल्याबाबत

(३८) ४६४२१ (०२-०७-२०२२). श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.माळवाकद (ता.महागांव, जि.यवतमाळ) येथील गावकऱ्यांच्या अनन्वित छळाला कंटाळून महिनाभरापूर्वी पारधी समाजाच्या ६० कुटूंबियांना मुलाबाळांसह दोन किलोमीटर अंतरावरील एका जंगलात वास्तव्य करण्याची वेळ आल्याचे दिनांक २८ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू गावात मोठ्या संख्येने पारधी समाज बांधव राहत असून आरक्षणामुळे गावचे सरपंच पद एका तरुणाकडे आल्यापासून त्याला मारहाण करणे तसेच पारधी समाजाच्या महिलांना त्रास देणे व गावकऱ्यांकडून विघातक प्रवृत्ती वाढल्यामुळे पारधी कुंटुंबियांना गाव सोडून जावे लागल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच यवतमाळ जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा व अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचेशी संपर्क साधून अत्याचारग्रस्तांना सोयी पुरवाव्यात अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे केल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार पारधी कुंटुंबियांना त्रास देणाऱ्या विघातक प्रवृत्तींविरुध्द व त्रास देणाऱ्या ग्रामस्थांविरुध्द कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०८-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) यवतमाळ जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा व अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी, यवतमाळ यांना याबाबत निवेदन दिले आहे. तथापि, सदर निवेदन पारधी कुटूंबियांनी दिले नसल्याचे आणि सदर मागण्या त्यांनी केलेल्या नसल्याचे कळविले आहे.
(४) मौ.माळवाकद (ता.महागांव, जि.यवतमाळ) येथील पारधी व बंजारा समाजामध्ये तेढ निर्माण केल्याने व पारधी समाजातील लोकांना जातीवाचक व अश्लिल शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तक्रारीवरून पोलीस स्टेशन महागाव येथे अप क्र.१५१/२०२२, भारतीय दंडविधान संहिता कलम २९४, ५०४, ५०६, अनुसूचित जाती जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा, १९८९ कलम ३ (२) (व्ही) (ए), ३ (१) (एन) (एस) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय, पुसद यांचे न्यायालयात क्र.३५१/२०२२, दिनांक ०६.०७.२०२२ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

दुर्गाडी किल्ला (ता.कल्याण, जि.ठाणे) परिसरातील उल्हास खाडी गणेश घाट येथे होत असलेल्या रेती उत्खननाबाबत

(३९) ४६७४७ (२८-०६-२०२२). श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दुर्गाडी किल्ला (ता.कल्याण, जि.ठाणे) परिसरातील उल्हास खाडी व गणेश घाट येथे मोठ्या प्रमाणात अवैध रेती उत्खनन होत असून त्याकडे स्थानिक प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे दिनांक १५ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २० मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास तहसिलदार, कल्याण यांचेकडे निवेदन दिले आहे , हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने अवैध रेती उत्खनन रोखण्याबाबत तसेच संबंधित ठेकेदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१८-०८-२०२२) : (१), (२) व (३) ता.कल्याण, जि.ठाणे येथील दुर्गाडी परिसर व गणेश घाट येथे अवैध वाळूचे उत्खनन वाहतूक होत असल्याचे निदर्शनास आल्याने तहसिलदार, कल्याण यांचे अधिनस्थ पथकामार्फत वेळोवेळी कारवाई करण्यात आलेली आहे.

कल्याण येथील दुर्गाडी परिसर, उल्हास खाडी, गणेश घाट येथे वाळूचे अवैध उत्खनन रोखण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २०/५/२०२२ रोजी जिल्हाधिकारी, ठाणे व तहसिलदार, कल्याण यांना निवेदन दिले आहे.

कल्याण परिसरात वाळूचे अवैध उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी तहसिलदार, कल्याण यांचेमार्फत दिनांक २५/५/२०२२, दिनांक २७/५/२०२२ व दिनांक २७/६/२०२२ रोजी कारवाई करण्यात आली असून सदर कारवाईच्या वेळी ३९ ब्रास वाळूसाठा जप्त करण्यात आला असून ९ सक्शन पंप नष्ट करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे महानगरपालिका हद्दीत अवैध गैरकारभार सुरु असल्याच्या तक्रारीबाबत

(४०) ४७०४० (२८-०६-२०२२). श्री.संजय केळकर (ठाणे) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका हद्दीतील हुक्काबार पार्लर, डान्सबार व इतर अवैध कामे सुरु असल्याची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधीनी गृह विभागाकडे नुकतीच केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन निर्णयाप्रमाणे हुक्का पार्लरवर १००% बंदी असताना अनेक पोलीस ठाण्याच्या हद्दीत हुक्का पार्लर सुरु असल्याने तरुण पिढीवर विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठाणे शहरासह संपूर्ण राज्यात हुक्का पार्लरवर घालण्यात आलेल्या बंदीची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदरहू अवैध हुक्का पार्लर, डान्सबार तसेच अवैध कामांविरुध्द शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०८-२०२२) : (१) होय हे खरे आहे.

याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक ११.०१.२०२२ रोजी तक्रार अर्ज दाखल केलेला आहे.

(२), (३) व (४) हुक्का पार्लर संदर्भात :- सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) अधिनियम, २००३ चा सुधारीत अधिनियम, २०१८ कलम ४ व २१ अन्वये जानेवारी, २०२० ते जून, २०२२ या कालावधीत ठाणे पोलीस आयुक्तालयांतर्गत अवैधरित्या हुक्कापार्लर चालविणाऱ्या बार/हॉटेल मालकांवर एकूण १८ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

महाराष्ट्र राज्यामध्ये सन २०२० मध्ये १८९, सन २०२१ मध्ये २२३ व जून, २०२२ अखेर १३५ अनाधिकृत हुक्का पार्लरवर कारवाई करण्यात आलेली आहे.

ऑर्केस्ट्रा बार संदर्भात :- ठाणे पोलीस आयुक्तालयांतर्गत बार आस्थापना विहित वेळेपेक्षा जास्त वेळ चालू ठेवली असल्याने सन २०२१ मध्ये ९ व जून २०२२ अखेर ४ आणि महिला वेटर ग्राहकास मद्य पुरवित असताना अश्लिल कृती/हावभाव करताना आढळून आल्याने त्यांचे विरूद्ध भा.दं.वि. कलम २९४, महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ कलम ३३ (डब्ल्यू), १३१ अन्वये १ असे एकूण १४ गुन्हे नोंद करण्यात आले आहेत.

महाराष्ट्र राज्यामध्ये सन २०२० मध्ये ५३, सन २०२१ मध्ये १३० व जून, २०२२ अखेर १०३ ऑर्केस्ट्राबार वर कारवाई करण्यात आलेली आहे.

अवैध धंद्यांसंदर्भात :- ठाणे पोलीस आयुक्तालयांतर्गत दारूबंदी कायद्यान्वये सन २०२१ मध्ये ६२ व जून, २०२२ अखेर ७४ आणि जुगार कायद्यान्वये सन २०२१ मध्ये ११६ व जून, २०२२ अखेर ४० गुन्हे दाखल करण्यात आले आहेंत.

महाराष्ट्र राज्यामध्ये दारूबंदी कायद्यान्वये सन २०२० मध्ये ८१२२, २०२१ मध्ये ९४१२३ व जून, २०२२ अखेर ४६००४ आणि जुगार कायद्यान्वये सन २०२० मध्ये २३१५८, सन २०२१ मध्ये २७९११ व जून, २०२२ अखेर १४९८६ गुन्हे दाखल करण्यात आले आहेंत.

यासंदर्भात राज्यामध्ये खालीलप्रमाणे उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

१) अंमली पदार्थ सेवनाचे दुष्परिणामाबाबत महाविद्यालये, शाळा, विद्यासंकुले येथे शिबीरे, जनजागृतीचे बॅनर व भित्तीपत्रके सार्वजनिक ठिकाणी लावणे, पथनाट्य तसेच समाजमाध्यमाद्वारे जनजागृती करण्यात येत आहे.
२) ऑर्केस्ट्राबारच्या ठिकाणी पोलिसांची गस्त व पाहणी तसेच नियमबाह्य घटनांबाबत त्वरीत कारवाई करण्यात येते.
३) अंमली पदार्थ खरेदी विक्री करणाऱ्यांवर कायदेशीर व प्रतिबंधक कारवाई करण्यात येते व त्याबाबत वृत्तपत्राद्वारे व समाजध्यमांद्वारे व्यापक प्रसिध्दी करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

अकोला शहरात चौधरी कोचिंग क्लासच्या संचालकाने अल्पवयीन विद्यार्थींनीसोबत केलेले गैरवर्तन

(४१) ४७११० (२८-०६-२०२२). श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला (जि.अकोला) शहरात चौधरी कोचिंग क्लासच्या संचालकाने अल्पवयीन विद्यार्थींनीसोबत असभ्य वर्तन, छेडछाड व मोबाईलवरुन गैरभाषेत चॅटिंग केल्याचे दिनांक २० मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर संचालकाने अवैध बांधकाम करुन कोचिंग क्लासची इमारत उभी करुन शासनाची फसवणूक देखील केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, सदर दोषी संचालकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०८-२०२२) : (१) होय, याबाबत भादंविसं कलम ३७६(२)(f), ३५४, ३५४ (अ)(ब)(ड) , ५०६, २०१, तसेच पोक्सो अधिनियमातील कलम ६,८,१०,१२ अन्वये दिनांक २२.०५.२०२२ रोजी पोलीस स्टेशन सिव्हील लाईन, अकोला येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(२) अकोला महानगरपालिका, अकोला यांच्याकडून अनाधिकृत बांधकाम केल्याप्रकरणी बांधकाम धारकास दिनांक ०२.०७.२०१४, दिनांक १७.१०.२०१८ व दिनांक ०८.०६.२०२२ रोजी नोटीस देण्यात आली आहे.
(३) सदर प्रकरणी आरोपीविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे. सद्यस्थितीत आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील सुतगिरण्या व यंत्रमाग उद्योग बंद पडण्याची शक्यता निर्माण झाल्याबाबत

(४२) ४७२३० (०२-०७-२०२२). कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) : सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कापूस दरवाढ तसेच अपुरा पुरवठा झाल्याने सुतगिरण्या आणि यंत्रमाग उद्योग धोक्यात आल्याचे दिनांक २३ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त दरवाढीमुळे सर्व सुतगिरण्या व यंत्रमाग, कारखाने कोणत्याही क्षणी बंद पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात कापसाचे दर तसेच पुरवठा नियमित होईपर्यंत सहकारी व खाजगी सुतगिरण्या बंद करण्याचा निर्णय जाहिर करावा अशी मागणी अनेक सुतगिरण्या चालकांनी वस्त्रोद्योग महासंघाचे अध्यक्ष यांच्याकडे केली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (२१-०९-२०२२) : (१) होय, सदर बाब दिनांक २३ मे, २०२२ व दिनांक २४ मे, २०२२ रोजीच्या दैनिक वर्तमानपत्रामधील बातमी द्वारे निदर्शनास आले आहे.
(२) ज्या सूतगिरण्यांची व यंत्रमागाची आर्थिक स्थिती ठीक नाही अशा संस्था बंद पडण्याची शक्यता नाकारता येत नाही.
(३) काही कारखान्यांनी कापसाचे दर वाढ झाल्याने तसेच कापूस वेळेत उपलब्ध होत नसल्याने सूताचे दरामध्ये वाढ झाल्याने व गिरणीचे खेळते भागभांडवल संपूष्टात आल्याने सहकारी सूतगिरण्या व खाजगी सूतगिरण्या बंद करण्याचा निर्णय जाहिर करावा अशी मागणी अनेक सूतगिरणी चालकांनी महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ मर्या., मुंबई यांच्याकडे दुरध्वनीवरुन केली असल्याचे दिनांक ०६.०७.२०२२ रोजीच्या पत्रान्वये सचिव, महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ मर्या., मुंबई यांनी कळविले आहे.
(४) यासंदर्भात मार्ग काढण्यासाठी सर्व संबंधीतांची शासन स्तरावर बैठक घेण्यात येईल.
(५) प्रश्न उदभवत नाही.

चांदूर रेल्वे (जि.अमरावती) तालुक्यातील तुळजापूर, राजना, वाई व शिरजगाव (कोरडे) या शिवारातील शेतजमिनींचा अकृषक म्हणून वापर केल्याबाबत

(४३) ४७२८९ (२८-०६-२०२२). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल

पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदूर रेल्वे (जि.अमरावती) तालुक्यातील तुळजापूर, राजना, वाई व शिरजगाव (कोरडे) या शिवारातील शेतजमिनींचा अकृषक म्हणून वापर केल्याप्रकरणी चांदूर रेल्वेचे तहसिलदार यांनी आवादा एमएच स्टेनेबल प्रा.लि.नोयडा या कंपनीला १ कोटी ९० लाखांचा दंड ठोठावला असल्याचे दिनांक १६ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू दंड माफ करु नये अशी मागणी तालुक्यातील ग्रामस्थांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कंपनीने केलेल्या फसवणुकीबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने दंड वसुलीबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१७-०८-२०२२) : (१) होय, हे खरे आहे. यामध्ये आवादा एमएच स्टेनेबल प्रा.लि.नोयडा या कंपनी ला मौजे राजना करीता रु.६०,१४,५७६/-, मौजे तुळजापूर करीता रु.३७,८२,२४२/-, मौजे वाई करीता रु.४६,९०,४८७/- व मौजे शिरजगांव कोरडे करीता रु.४५,४२,५५१/- या गावातील विनापरवानगी अकृषक जमीनीवर एकूण रु.१,९०,२९,८५६/- दंड आकारण्यात आला आहे.

(२) सदर बाब निदर्शनास आली नाही.

(३) सदर ४ प्रकरणामध्ये एकूण रु.१,९०,२९,८५६/- दंड आकारण्यात आलेला आहे. त्यापैकी ३१,७१,६००/- (अक्षरी एकतीस लाख ऐकाहत्तर हजार सहाशे रुपये फक्त) शासकीय खजिन्यामध्ये भरणा केलेला आहे. त्यानंतर आवादा एमएच स्टेनेबल प्रा.लि. कंपनीने उपविभागीय अधिकारी, कार्यालयात चांदूर रेल्वे येथे अपील दाखल केले आहे.

(४) प्रश्नच उद्भवत नाही.

शासनाच्या शेतमालाच्या हमी भाव खरेदीवर ऑनलाईन पीक पेरा नसल्याबाबत

(४४) ४७९०५ (२८-०६-२०२२). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाची रब्बी पिकांची ऑनलाईन “ई” पीक पाहणी व ॲपवर नोंदणीची मुदत दिनांक १८ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास संपली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे शेतमालाला आधारभूत किंमतीने खरेदीसाठी हरभरा नोंदणी करिता मुदत असली तरी ऑनलाईन पीक पेरा नसेल तर शेतकऱ्यांना नोंदणी करता येणार नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे शासनाने निर्णय घेऊन शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१७-०८-२०२२) : (१), (२) व (३) हे खरे नाही.

सन २०२१-२२ च्या रब्बी हंगामाच्या पीक पाहणीसाठी दिनांक १५ फेब्रुवारी, २०२२ ही अंतिम तारीख निश्चित केलेली होती. दरम्यान राज्याच्या काही भागात कोरोना महामारी व उशीराच्या मान्सूनमुळे शेतक-यांना पीक पाहणी करता यावी, म्हणून राज्यस्तरीय अंमलबजावणी समितीच्या दिनांक १५/०२/२०२२ च्या बैठकीतील सूचनेप्रमाणे तीन वेळा प्रत्येकी १५ दिवसांची मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्यामुळे रब्बी हंगामाची पीक पाहणीची अंतिम मुदत ही दिनांक ३१ मार्च, २०२२ पर्यंत होती. तसेच दिनांक १८ फेब्रुवारी, २०२२ नंतरही ऑनलाईन पीक पेरा नोंदविण्याची सुविधा उपलब्ध होती. सबब आधारभूत किंमतीने खरेदीसाठी हरभरा नोंदणीकरीता या ई-पीक पाहणी मधील नोंदीची अडचण नव्हती.

तसेच सन २०२१-२२ च्या रब्बी हंगामामध्ये ई-पीक पाहणी मध्ये ऑनलाईन पीक पेरा भरणेसाठी पुरेशी मुदत देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर विभागात क्षेत्रदुरूस्तीची बरीच प्रकरणे कार्यवाही विना प्रलंबित असल्याबाबत

(४५) ४८०४९ (२८-०६-२०२२). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील बहुतांश जिल्ह्यात विशेषत: नागपूर विभागात क्षेत्रदुरूस्तीची बरीच प्रकरणे कार्यवाहीविना प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रस्तुत प्रकरणांमध्ये अंतिम कार्यवाहीचे अधिकार जिल्हाधिकारी यांना असून सदरहू प्रकरणे जिल्हाधिकारी यांच्या स्तरावरुन निकाली काढण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे नागरिकांना या कामांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या ठिकाणी सतत ये-जा करण्याकरिता नाहक आर्थिक भूर्दंड सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-०८-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) हे खरे नाही
(४) व (५) क्षेत्र दुरूस्ती प्रकरणांमध्ये मोजणी करणे, संबंधितांना नोटीस देणे, चौकशी करणे, जाबजबाब घेणे यामध्ये बराच कालावधी जात असल्याने क्षेत्र दुरूस्तीची प्रकरणे प्रलंबित राहत आहेत. प्रलंबित क्षेत्र दुरुस्ती प्रकरणांबाबत वेळोवेळी आढावा घेण्यात येत असून प्रलंबित प्रकरणे निकाली करण्याबाबत सूचना संबंधितांना देण्यात आलेल्या आहेत.

उस्मानाबाद जिल्ह्यात गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेसाठी विमा कंपनीच नियुक्त न केल्याबाबत

(४६) ४८१३८ (२८-०६-२०२२). श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद), श्री.राजन साळवी (राजापूर) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषतः उस्मानाबाद जिल्ह्यात गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेसाठी शासनाने विमा कंपनीच नियुक्त न केल्यामुळे मागील वर्षाप्रमाणे यावर्षीही योजनेला खंड पडल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेची दोन महिन्यांपूर्वीच मुदत संपली असताना अद्यापही शासनाकडून विमा कंपनी नियुक्त करण्यात आली नाही तसेच कंपनीने प्रस्तावही स्वीकारणे बंद केले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोणत्याही विमा सुरक्षेशिवाय राबणा-या शेतक-यांचे मृत्यूचे प्रमाण वाढलेले असल्याने सदर योजना पूर्ववत सुरु करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अब्दुल सत्तार (१७-०८-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे.

सन २०२१-२२ या वर्षातील गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना दिनांक ०७.०४.२०२१ ते दिनांक

०६.०४.२०२२ या कालावधीत राबविण्यात आलेली आहे. सदर विमा योजना पॉलिसीचा कालावधी दिनांक ०६.०४.२०२२ रोजी संपुष्टात आला आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

सन २०२२-२३ या वर्षात गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना अंमलबजावणीसाठी स्पर्धात्मक ई-निविदा प्रक्रीया राबवून विमा कंपनी व विमा सल्लागार कंपनीची नियुक्ती दिनांक ८.०८.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे.

दिनांक ०७.०४.२०२१ ते ०६.०४.२०२२ या कालावधीत विमा प्रस्ताव योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार ९० दिवसापर्यंत विमा कंपनीला स्वीकारणे बंधनकारक आहे व त्यानंतर ३६५ दिवसापर्यंत मा.जिल्हाधिकारी यांचे स्तरावरील समन्वय समितीच्या शिफारशीने विमा प्रस्ताव विमा कंपनीला स्वीकारणे बंधनकारक आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

जामसर (वडपाडा) (ता.जव्हार, जि.पालघर) या गावातील सहा वर्षीय आदिवासी शाळकरी मुलीचा संशयास्पद झालेला मृत्यु

(४७) ४८४१४ (२८-०६-२०२२). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जामसर (वडपाडा) (ता.जव्हार, जि.पालघर) या गावातील सहा वर्षीय आदिवासी शाळकरी मुलीचा संशयास्पद मृत्यू झाल्याची घटना दिनांक १४ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास घडल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू पिडीत मुलीच्या नातेवाईकांनी जव्हार पोलिस ठाण्यात तक्रार केल्यानंतर दुसऱ्या दिवशी मुलीचा मृतदेह जंगालात आढळून आल्याचेही दिनांक १५ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी पोलिसांनी चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०८-२०२२) : (१) होय.
(२) होय.
(३) सदर प्रकरणी एकूण दोन आरोपी असून त्यांनी सदर बळीत मुलीवर बलात्कार करुन तिचा खून केला म्हणून त्यांचेविरुध्द पोलीस ठाणे जव्हार, पालघर येथे गुरनं. ११३/२०२२, भादंविसं कलम ३०२, २०१, ३४१, ३७६, ३७६(ड), ३४ सह बालकाचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ४,६,८,१२,१६ व १८ प्रमाणे दिनांक १६.०६.२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आले आहे. आरोपीविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे. सद्यस्थितीत आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

काटेमानिवली (ता.कल्याण, जि.ठाणे) येथे एका १८ वर्षीय विद्यार्थीनीने केलेली आत्महत्या

(४८) ४८४२६ (२८-०६-२०२२). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) मधील काटेमानिवली येथे राहणाऱ्या एका १८ वर्षीय विद्यार्थीनीने इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरुन उडी मारुन आत्महत्या केल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे

आहे काय,
(२) असल्यास, सदरहू विद्यार्थीनीच्या महाविद्यालयातील समूहामधील तरुणांनी तिच्यावर अत्याचार करुन केलेले व्हीडीओ चित्रीकरण प्रसारित करण्याची धमकी दिली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित दोषींवर गुन्हे दाखल करुन शिक्षा देण्यासंदर्भात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०८-२०२२) : (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणी कोळसेवाडी पोलीस ठाणे येथे सीआरपीसी कलम १७४ नुसार अकस्मात मृत्यु रजि. नंबर ८३/२०२२ नोंद करण्यात आली. सदर प्रकरणी चौकशी मध्ये मयत हिने मोबाईलमध्ये लिहून ठेवलेल्या नोट्स मिळून आल्याने गु.र.नं.३०६/२०२२ भा.दं.वि. कलम ३७६(ड), ३०५, ३०६, ३५४, ३४ सह बालकांचे लैंगिक अपराधापासुन संरक्षण अधिनियम २०१२ चे कायदा कलम ६, ८, १२, १७ माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६(ड), ६७(बी) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्ह्यांमध्ये आठ आरोपिंना अटक करण्यात आली असून गुन्ह्याचा तपास चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

भिवंडी शहरात (जि.ठाणे) चिलिम विक्रीचे प्रमाण वाढत असल्याबाबत

(४९) ४८४९१ (२८-०६-२०२२). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) शहरात अंमली पदार्थ ओढण्यासाठी लागणाऱ्या चिलिम विक्रीचे प्रमाण दर आठवड्याला वाढत असल्याचे दिनांक ६ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच दिवसेंदिवस पोलिस कारवाईत शेकडो किलो अंमली पदार्थ जप्त करण्यात येऊनही त्याच्या विक्रेत्यांची संख्या वाढतच आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार अंमली पदार्थाची विक्री व सेवनास आळा घालण्याकरिता शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०८-२०२२) : (१) नाही.
(२) ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या परिमंडळ-२ भिवंडी येथे माहे जानेवारी २०२२ ते जून २०२२ या कालावधीत अंमली पदार्थ विक्री करणाऱ्यांविरूध्द एकूण ७ गुन्हे दाखल करण्यात आले असून ७ गुन्हे उघड झाले असून त्यामध्ये एकूण १३ आरोपितांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्यांचा तपास सुरू आहे. तसेच गांजा सेवनाबाबत एकूण ६० गुन्हे दाखल करण्यात आले असून ६० गुन्हे उघड झाले असून सदर गुन्हयात एकूण ६५ आरोपितांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयांपैकी एकूण ५३ गुन्हे मा.न्यायालयात प्रलंबित असून ०७ गुन्हे पोलीस तपासाधीन आहेत.
(३) अंमली पदार्थाची विक्री व सेवनास आळा घालण्याकरिता गुप्त बातमीदारांमार्फत अंमली पदार्थ सेवन / विक्रीबाबत माहिती मिळवून तात्काळ कारवाई करण्यात येते. अंमली पदार्थ विरोधी कारवाईअंतर्गत प्रभावी तपासाबरोबरच जनतेने अंमली पदार्थांच्या आहारी जाऊ नये म्हणून जनजागृतीच्या उद्देशाने “२६ जून” या अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त २६ जून ते १० जुलै असा अंमली पदार्थ विरोधी पंधरवडा साजरा करण्यात येतो. याशिवाय वेळोवेळी अंमली पदार्थ व त्याचे दुष्परिणाम याबाबत जनतेस तसेच विद्यार्थ्यांना माहिती देणे, फिल्म दाखविणे, चर्चासत्र, हॅन्डबील वाटप व भिंती पोस्टर्सचे प्रदर्शन करणे तसेच प्रचार फेऱ्या, मॅरेथॉन, मोहल्ला कमिटी, पब्लीक मिटींग असे कार्यक्रम घेण्यात येतात.

(४) प्रश्न उद्धवत नाही.

औंढा नागनाथ (जि.हिंगोली) तालुक्यात ग्रामीण रोजगार हमी योजनेत गैरव्यवहार झाल्याबाबत

(५०) ४८८०५ (०१-०७-२०२२). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) : सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औंढा नागनाथ (जि.हिंगोली) तालुक्यातील आठ गावांमध्ये महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेत गावाची मागणी नसताना गॅबियन बंधारे करून लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी तत्कालीन प्रभारी गटविकास अधिकाऱ्यांसह अन्य कर्मचाऱ्यावर औंढा पोलिसात गुन्हा नोंद झाला असल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गैरव्यवहार प्रकरणी चौकशी समिती नेमण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासानाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर चौकशी समितीने दिलेल्या अहवालानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संदीपानराव भुमरे (१७-०८-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असून दोषी अधिकारी/कर्मचारी यांच्याविरूध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तसेच काही अधिकारी/कर्मचारी यांचेवर शिस्तभंगाची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

विधान भवन :
नागपूर.

राजेन्द्र भागवत
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.